
मनोज तायडे

# कर्मयोगी गाडगेबाबा



MR
891.46
T 21 K

INDIAN INSTITUTE
OF
ADVANCED STUDY
LIBRARY, SHIMLA

# कर्मयोगी गाडगेबाबा

मनोज तायडे

Entered

लोकवाङ्मय गृह

**कर्मयोगी गाडगेबाबा** / मनोज तायडे
Karmayogi Gadagebaba / Manoj Tayade

Library IIAS, Shimla
MR 891.46 T 21 K
00124330

म / ९२३
© मनोज तायडे
पहिली आवृत्ती : फेब्रुवारी १९९१
दुसरी आवृत्ती : एप्रिल १९९२
तिसरी आवृत्ती (I) : एप्रिल १९९९
चौथी आवृत्ती (I) : मे २००३
पाचवी आवृत्ती (I) : जानेवारी २००५
सहावी आवृत्ती (I) : जुलै २००७ July 2007

MR
891.46
T21 K

मुखपृष्ठ : कमल शेंडगे

मूल्य : २० रुपये Rs. 20/-

ISBN 81-86995-27-7

124330
31.3.08

मुद्रक/प्रकाशक
प्रकाश विश्वासराव Prakash
लोकवाङ्मय गृह
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५

मुद्रणस्थळ
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

# कर्मयोगी गाडगेबाबा

रत्नागिरी जिल्ह्यातले खारेपाटण गाव. ५ मे १९२३ ची रणरणती दुपार. गावात एका बाबाने प्रवेश केला. अंगावर फाटक्या चिंध्याचे कुडते, सतरा ठिगळाचे धोतर, हातात खापर, डोक्याला फाटकेसेच कापड बांधलेले असा विचित्र वेश. सोबत काही मंडळी. गावाबाहेर प्रशस्त सावलीचे झाड बघून मुक्काम पडला. सोबतच्या लोकांना गावातून भाकर मागून आणण्याची आज्ञा झाली. मंडळी गावात पांगली पण काही वेळातच परत आली; रिकाम्या हाताने.

"काहून जी? भाकर नाई आनली?"

सर्वांचे चेहरे गंभीर. कुणी काही बोलेना.

त्यांचे डोळे भरून आले होते. बाबांनी विस्मयाने विचारले, "काय झालं?"

मंडळीमधील एकजण कसेबसे बोलला, "बाबा, आपला गोविंदा गेला."

बाबांनी क्षणभर डोळे मिटले. गोविंदा म्हणजे बाबांचा एकुलता एक मुलगा. दुसऱ्याच क्षणी डोळे उघडले. हाती खापर घेतले आणि भाकर आणायला गावात निघून गेले. सोबतची सारी मंडळी अवाक् होऊन पाहत राहिली. बाबांच्या मुलाच्या निधनाची तार गावात आली होती. गावात पोचल्याबरोबर ती भाकर मागायला गेलेल्या मंडळींच्या हातात पडली म्हणून ती तशीच परत फिरली होती, पण बाबांना त्याचे काहीच कसे वाटले नाही?

सायंकाळी सारे पटांगण झाडून-पुसून स्वच्छ करण्यात आले. गॅसबत्त्या टांगल्या गेल्या. बाबा ठरल्याप्रमाणे रात्री कीर्तनास उभे राहिले.

*गोपाला गोपाला, देवकीनंदन गोपाला*
*सांभाळी ही तुझी लेकरे, पुण्य समजती पापाला*

असा गजर सुरू झाला. बोलता बोलता बाबा म्हणाले,

— राम गेले, कृष्ण गेले, पांडवही गेले.

*ऐसे गेले कोट्यानुकोटी ।*
*काय रडू मी एकासाठी*

— खंत तरी कोनाकोनाची कराची?

दुसऱ्या दिवशी बाबा ठरल्याप्रमाणे पुढील गावी चालते झाले.

मित्रांनो, स्वतःच्या एकुलत्या एका मुलाच्या निधनानंतरही अविचल राहणाऱ्या या गृहस्थाजवळ अशी कोणती शक्ती होती? कोण हा गृहस्थ? ते होते साऱ्या महाराष्ट्राला परिचित असणारे कर्मयोगी गाडगेबाबा.

## जन्म आणि बालपण

विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यात शेणगाव नावाचे लहानसे खेडे. भुलेश्वरी नदीच्या तीरावर वसलेले. वऱ्हाडातील इतर खेड्यांप्रमाणे सर्वसामान्य. शेणगावातील परीट घराण्यात नागोजी जानोरकर नावाचे गृहस्थ. परटास विदर्भात वठ्ठी म्हणतात. नागोजीला तीन मुले. राणोजी, कराजी आणि जानोजी. राणोजीला एकच मुलगा झाला, त्याचे नाव झिंगराजी ठेवले. जानोजीला एकही अपत्य झाले नाही. त्याच्याजवळ स्वतःच्या मालकीची थोडी जमीन, चार गुरेढोरे होती. अपत्य नाही याचे दुःख जानोजीने केले नाही. त्याने झिंगराजीवरच पुत्रवत प्रेम केले. बापाच्या आणि काकाच्या लाडात झिंगराजी मोठा झाला. त्या काळी बालविवाहाची प्रथा रूढ होती. त्यामुळे लवकरच शेणगावाहून जवळ असलेल्या दापुरे गावच्या हंबीरराव कोळसकरांच्या मुलीसोबत, सखूबाईसोबत, झिंगराजीचा विवाह झाला.

जानोजीने मरतेसमयी आपली सर्व शेती, गुरेढोरे आणि घर झिंगराजीच्या नावे करून दिले. काकाच्या मागोमाग झिंगराजीच्या वडिलांनी, राणोजींनी, देह ठेवला. तरुण वयात झिंगराजीवर फार मोठी जबाबदारी आली.

स्वातंत्र्यापूर्वीचा काळ. निरक्षरता आणि अंधश्रद्धा यामुळे काळोखलेला. खेड्यापाड्यातच काय पण तालुक्यापर्यंतही शाळा पोचल्या नव्हत्या. त्यामुळे खेडे म्हणजे विचित्र रूढी-परंपरा, अंधश्रद्धा, देवदेवतांबद्दल विक्षिप्त कल्पना यांचे आगर.

गावात रोगराई आली की कर नवस आणि नवस फेडायचा म्हणजे कोंबडे-बकरे बळी देणे आलेच. लेकरू होत नसेल तरी बळी आणि जन्माला आले तर त्या आनंदातही पशुबळी. झिंगराजीने लेकरू व्हावे म्हणून देवदेवतांना कोंबड्या-बकऱ्याचे बलिदान केले. पहिली मुलगी झाली. पुन्हा उत्सव साजरा झाला. पण लवकरच ती मुलगी गेली. कुण्यातरी देवतेचा कोप झाला म्हणून मुलगी गेली असा समज. मग त्या देवतेला प्रसन्न करण्यासाठी पुन्हा प्राण्यांचे बलिदान. तीर्थ म्हणून दारू.

याप्रमाणे दारूचे पाऊल झिंगराजीच्या घरात पडले आणि तिने साऱ्या घरादारचे वाटोळे केले. सारा जमीनजुमला, गुरेढोरे सावकाराच्या घशात गेली. एकेकाळी प्रतिष्ठित असलेला झिंगराजी कफल्लक बनला. अशा परिस्थितीत २३ फेब्रुवारी १८७६ रोजी महाशिवरात्रीच्या दिवशी सखूबाईला मुलगा झाला. मुलाचे नाव डेबू ठेवले. अशा दुर्दशेमध्ये जन्मलेला डेबू पुढे कर्मयोगी गाडगेबाबा या नावाने विख्यात होईल असे कोणालाही वाटले नसेल.

## वडिलांचे निधन

एकेकाळी नांदणारे घर आता उद्ध्वस्त झाले होते. लहानग्या डेबूला घेऊन सखूबाई मोलमजुरीला जाई. पण तिची मजुरीसुद्धा झिंगराजी दारूत उडवून देई. बायको-मुलाला मारझोड करी. दारूने झिंगराजीला पोखरून काढले होते. अनेक रोगांनी त्याला भक्ष्य बनविले होते. सारे गाव छी:थू करायला लागल्यावर झिंगराजीने गाव सोडले व भूलेश्वरीच्या पलीकडील तीरावर असलेल्या कोतेगावला मावसभावाकडे जाऊन राहिला. झिंगराजी फार दिवस जगला नाही. मृत्यूच्या दारात असताना त्याने सखूबाईस सांगितले, "सखू, खंडोबा, बहिरोबा, मातामाय ही दैवते आता देव्हाऱ्यात ठेवू नको. त्यांच्या भक्तीला डेबूला लावू नको. जो प्राण्यांचा बळी घेऊन संतुष्ट होतो तो देवच नाही! हे देव घरात नसते आणि त्यांना बळी दिले नसते तर मी दारुडा झालो नसतो. आता मात्र एक कर, डेबूला या देवीदेवतांच्या नादी लागू देऊ नको, दारूकडे वळू देऊ नको."

एवढे बोलून झिंगराजीने प्राण सोडला. लहानगा डेबू पोरका झाला.

## बालपण

वडिलांच्या मृत्यूनंतर मामा चंद्रभानजी लहानग्या डेबूला आणि सखूबाईला दापुऱ्याला घेऊन आला. दापुऱ्याला आला तेव्हा डेबूचे वय सहा-सात वर्षांचे होते. सखूबाई माहेरी आली पण माहेरावर तिने आपला भार पडू दिला नाही. कष्ट केल्याने माणूस सर्वांना प्रिय होतो हे तिला माहीत होते. सखूबाईने पहाटे उठावे चारसहा पायल्यांचे दळण दळावे. त्यानंतर गोठ्यात जाऊन गाईबैलांचे शेणमूत्र काढावे. गोठा झाडून-पुसून स्वच्छ करावा. दुपारी शेतात जावे. आपल्या कामामुळे सखूबाई भाऊ-भावजय, माता-पिता सर्वांना आवडत होती.

हे सारे डेबूच्या डोळ्यासमोर घडत असल्याने त्याच्या मनावर श्रमाचे संस्कार व्हायला वेळ लागला नाही. एक दिवस डेबूच मामाला म्हणाला, "मी ढोरं चाराले जात जाईन. गवाऱ्याले दुसरं काम सांगा."

वऱ्हाडात गुरे चारणाऱ्याला गोवारी म्हणतात. दुसऱ्या दिवसापासून डेबू गुरांसोबत जाऊ लागला. दापुऱ्याला लागूनच पूर्णा नदीच्या काठावर मोठे रान. सारी गुराखी पोरे आपली गुरे घेऊन तेथे यायची. त्यात खंडारेचा नागो, उगल्याचा गणपत, टाकोणकराचा गणपत, रजपुताचा झामसिंग, महाराचा बबन, गोसाव्याचा शामभारती, पाटलाचा जयराम अशी विविध जातिधर्माची मुले होती. डेबूजी त्यांच्यात येऊन दाखल झाला. गुरे चारायची, विटीदांडू खेळायचा आणि पूर्णेच्या डोहात डुंबायचे असा सर्वांचा कार्यक्रम.

दापुऱ्यापासून तीन-चार फर्लांगावर पूर्णेच्या काठावर चिंचेचे मोठे बन होते. त्यात दोन पिंपळाची भलीथोरली झाडे. ते गोसाव्यांचे स्मशान असल्याने काही समाध्याही होत्या. बनात मध्यभागी महादेवाची पिंडी, समोर नंदी. दुपारच्या वेळी गुराखी मंडळी आपली गुरे या सावलीत बसवीत. सर्वजण आपल्या भाकऱ्या सोडीत आणि जातिपातीचा विचार न करता सहभोजन करीत. एका सवंगड्याने ढोलके तयार केले होते. डेबूजीने स्वत: एक चोणके तयार केले. आणि मग ढोलक्या-चोणक्याच्या तालावर सारे गाणी गाऊ लागले, भजन करू लागले.

गावात काही वारकरी होते. ते नियमाने सोमवारी-शनिवारी देवळात भजन करायचे. डेबू तिथे जाऊन बसायचा. सर्व अभंग, भजने, कान देऊन ऐकायचा आणि सकाळी गोठ्यात साफसफाई करताना गुणगुणायचा. स्मरणशक्ती जबरदस्त असल्याने पाठांतर लवकर व्हायचे. याच पाठांतराचा त्यांना पुढे फार उपयोग झाला.

डेबू चौदा-पंधरा वर्षांचा झाल्याबरोबर मामाने त्याला शेतीच्या कामात गुंतवले. सखूबाईलाही बरे वाटले. कारण शेतीच्या कामामध्ये जो निपुण तोच खरा शेतकरी असा त्या काळी समज होता आणि अशा शेतकऱ्याला मान होता. डेबू अंगापिंडाने चांगलाच दणकट आणि उत्साही होता. काळी आई त्याच्यासाठी पाटी आणि नांगर लेखणी झाला. लवकरच त्याने डवरणी, वरवरणी, नांगरणी, पेरणी यांच्यामध्ये नैपुण्य मिळवले. शेतीच्या कामात तो तरबेज झाल्यावर मामावरचा भार हलका झाला. शेती चांगली पिकू लागली. घरात समृद्धी आली.

## डेबूचे लग्न

डेबू सोळा-सतरा वर्षांचा झाला. त्याचे लग्नाचे वय उलटून गेले होते. कारण त्या काळी बालविवाह व्हायचे. सखूबाईला मुलाच्या लग्नाची काळजी वाटायला लागली. तिने भावाकडे गोष्ट काढली. मामा लग्न जुळविण्याची खटपट करू लागला. पण डेबूला मुलगी द्यायला कुणी तयार होईना. शेती नाही, घर नाही. मग मुलगी कशाच्या भरवशावर द्यायची, असा प्रश्न जो तो करू लागला. लोकांचेही

खरेच होते. डेबूच्या मालकीची शेती नव्हती. तो मामाच्या शेतीत कष्ट उपसत होता. अनेक ठिकाणी चंद्रभान मामा गेले. शेवटी कमालपूरचे धनाजी खल्लारकर यांनी आपली पोरगी देऊ केली. धनाजीच्या कुंताबाईसोबत डेबूजीचा विवाह झाला. पोराचे लग्न झाले याचा सखूबाईला फार आनंद झाला.

## खालावलेली आर्थिक स्थिती

डेबूजीच्या लग्नानंतर बळीरामचे लग्न झाले. बळीराम चंद्रभानजीचा मुलगा. पाठोपाठच त्यांच्या दोन मुलींची लग्ने. चार वर्षांत झालेल्या चार लग्नांमुळे मामाची आर्थिक स्थिती खालावली होती. चंद्रभानजीचा हात खर्चीक. लग्नात कुठेही हात आखडता घेतला नाही. त्यातच १८९६ व १८९९ मध्ये वऱ्हाडात मोठा दुष्काळ पडला. पीक आलेच नाही. खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी मामाने सावकाराकडून कर्ज काढले. याच काळात चंद्रभानजीचे जुने घर पडले. त्यांनी विटांचे नवे घर बांधण्याचे ठरविले. गावात विटांचे घर म्हणजे सुखवस्तू माणसाचे घर असे समीकरण होते. पण मामाने ठरविलेच. त्यासाठी पुन्हा कर्ज. पाहता पाहता कर्जाचा डोंगर वाढत गेला.

सावंगी दुर्गड्याचे तिडके सावकार चंद्रभानजीला कर्ज देत असे. चंद्रभानजी अशिक्षित माणूस. तो कर्ज मागत गेला आणि सावकर देत गेला, हिशेब कधी दाखविलाच नाही. चक्रवाढ व्याज वाढतच होते. पण एके दिवशी तिडके सावकाराचे बोलावणे आले. चंद्रभानजी सावंगी दुर्गड्याला गेले. सावकाराने चांगला आदरसत्कार केला. आपल्या पंक्तीला बसवून जेवू घातले. जेवण झाल्यावर नेहमीप्रमाणे दोघे दिवाणखान्यात पान खात बसले. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. गप्पांच्या ओघात सावकाराने चंद्रभानजीजवळ कर्जाचा विषय काढला. 'आपल्याकडून येणे असलेली रक्कम आपल्याला सांगू काय?' चंद्रभानजीकडून होकार मिळताच त्यांनी दिवाणजीला वहीखाते घेऊन येण्यास सांगितले. दिवाणजींनी वहीखाते आणले व चंद्रभानजीच्या नावे असलेली रक्कम सांगितली. रक्कम होती रुपये सोळाशे पंचवीस. आकडा ऐकताच चंद्रभानजी अस्वस्थ झाले. एवढे कर्ज आपल्यावर झाले असेल याची त्यांना कल्पनाच आली नाही. सावकाराच्या लक्षात त्यांची स्थिती आली. ते दिवाणजींना म्हणाले, "काही आलेली रक्कम लिहायची राहून गेली असेल तर पाहून घ्या दिवाणजी." पण दिवाणजींनी नकारार्थी मान हलविली.

सावकार मोठे गोड बोलणारे. ते चंद्रभानजीला म्हणाले, "ही रक्कम मी आताच तुम्हाला मागत नाही. सवडीने द्याल. पण आपण काय? आज आहोत; उद्या नाही. फक्त व्यवहार चोख असला पाहिजे म्हणजे आपल्यामागे आपल्या मुलाबाळांना

कटकट नको. त्यासाठी तुमची जमीन मला गहाण करून घ्यावी लागेल. तशी तुमची जमीन मला नको. माझ्याजवळच एवढी जमीन आहे की, कोणत्या गावी माझे कोणते शेत आहे हे रेकॉर्ड पाहूनच सांगावे लागते. फक्त व्यवहार म्हणून तुमचे गहाणपत्र करावे लागेल. कर्ज फिटले की जमीन परत.''

सावकाराच्या म्हणण्याला चंद्रभानजीने होकार देताच लगेच दुसऱ्या दिवशी सावकारांनी त्यांना मूर्तिजापूरास नेले आणि गहाणपत्र करून घेतले. चंद्रभानजी घरी आले तेव्हा त्यांचा चेहरा पडलेला होता. ते कुणाला काही बोलले नाहीत. पण सत्य कुठे लपते काय? सोळाशे पंचवीस रुपये कर्जापोटी आपली संपूर्ण शेती गहाण पडली ही वार्ता सगळ्यांनाच समजली. त्या काळचे सोळाशे म्हणजे आजचे दोन-अडीच लाख रुपये. यावरून कर्जाची रक्कम केवढी मोठी होती हे समजू शकते. एवढे मोठे कर्ज फेडून छप्पन एकर शेती सावकाराच्या मगरमिठीतून सोडवणे सोपे काम नव्हते पण वीस-बावीस वर्षांच्या डेबूने मामाला धीर दिला. आजा-आजीस सांगितले, ''दोन-चार वर्षं जास्त कष्ट करू. दोन घास कमी खाऊ. पण कर्ज फेडू. चिंता नको.''

मामाने भाच्याचे धिराचे शब्द ऐकले पण झालेली कर्जाची जखम बरी होऊ शकली नाही. आपल्यामुळेच सारे घर सावकाराच्या विळख्यात ओढले गेले याची खंत चंद्रभानजीला वाटू लागली. त्यांची तब्येत ढासळली. अंगात बारीक ताप राहू लागला, शरीर खंगत चालले आणि दोन-तीन वर्षांच्या आत चंद्रभानजीचे निधन झाले. बळीरामचा पिता, डेबूजीचा मामा, सखूबाईचा पाठीराखा भाऊ सारा पसारा उघड्यावर टाकून निघून गेला. घरावर आकाश कोसळले.

## घराची जबाबदारी

मामांच्या निधनानंतर साहजिकच कुटुंबाचा सारा भार डेबूजीवर पडला. त्याने सर्वांना धीर दिला. बळीरामला घेऊन तो शेतीच्या कामाला लागला. तीन-चार गड्यांऐवजी आता एकच गडी ठेवला. पहाटेपासून रात्रीपर्यंत सतत शेतात राबू लागला. शेतीची मशागत, बैलांचे चारापाणी सर्व स्वत: करायचा. स्वत:सोबत त्याने घरातील सर्वांना कामाला लावले. म्हातारी आजी निंदायला जाऊ लागली तर आजोबा काठी टेकत शेतीची राखण करू लागले. सखूबाई तर पूर्वीपासून शेतीत राबायचीच पण स्वत:च्या पत्नीलाही डेबूजीने कामाला लावले. ''सकाळी घरची कामे लवकर उरकवा आणि शेतात या'' असा डेबूजीचा आदेशच होता. डेबूजीने अतिशय कठोरपणे खर्चाला आवर घातला. गुरांचे खाणेपिणे वगळता घरातल्या चांगल्या खाण्यावर बंदी घातली. पूर्वी घरात वर्षांतून दहावीस सण साजरे होत. पोळा,

गणपती, दसरा, दिवाळी, संक्रांत. त्या दिवशी गोडधोड होई. त्यावर डेबूजीने बंदी घातली. आजोबा रागवायचे. म्हणायचे, "हा कुठला कृपणपणा! सणासुदीचे तूही गोडधोड खात नाही, आणि लोकांनाही खाऊ देत नाही!" त्यावर डेबूजीने उत्तर द्यावे. "पाहेजा, सावकाराचं रिन तसंच ठिवून सन करनं मले जमत नाई. थे गोड त मले जसं जहर होते!" दिवाळीत लोकांच्या घरी जेव्हा करंज्या-लाडू होत तेव्हा डेबूजीच्या घरी बेसन-भाकर शिजे.

हंगाम आला की डेबूजी किती खंडी ज्वारी घरी ठेवायची, किती सावकाराला द्यायची याचा हिशेब करू लागला. यंदा कापसाचे किती रुपये आले, गडीमाणसांना द्यायला किती लागतील, मजुरांसाठी किती ठेवायचे याचा हिशेब करून शिल्लक रक्कम सावकाराला नेऊन देऊ लागला. मामाने करून ठेवलेले कर्ज फेडणे आणि बळीरामची गहाण पडलेली जमीन सावकाराच्या तावडीतून सोडवणे एवढेच एक ध्येय डेबूजीसमोर होते.

## सावकारा पावती दे!

खळे उभे राहिले. कापूस, ज्वारी, तीळ, तुरी असे सगळे पीक हाती आल्यावर ते घेऊन डेबूजी तिडके सावकाराकडे गेला. ते त्याने सावकाराच्या कोठीत पोचते केले आणि म्हणाला, "हे इतलं पावलं, असी पावती द्या!"

सावकार आश्चर्याने डेबूजीकडे पाहू लागला. सोबत बसलेले भोवतालचे लोक तर चक्क हसले. कारण आजपर्यंत कुणी अशी गोष्ट ऐकलीच नव्हती. देण्याघेण्याचे सर्व व्यवहार सावकाराच्या विश्वासावरच चालत. त्याने फिटले म्हटले, की फिटले. सावकार आश्चर्याने विचारायला लागला, "पावती कशाची रे बोआ?"

"हा इतला माल पावला याची."

"आमच्यावर तुझा विश्वास नाही काय?"

"सवाल इश्वासाचा नाई. माल घेतला, पावती दिली. याले व्यवहार म्हंतेत!"

सावकाराच्या ध्यानी सगळे प्रकरण आले. हा डेबूजी आहे, भोळा चंद्रभानजी नव्हे, हे त्याने मनोमन जाणले. तो दिवाणजीला म्हणाला, "याचा माल जमा करा अन् याले पावती देजा. आता नको, सवडीनं द्या."

प्रत्येक वेळी डेबूजीने माल दिल्यावर पावती मागावी आणि सावकाराने पुढच्या वेळेचा वायदा करावा. शेवटी एका वर्षी जेव्हा सावकाराचे नोकर माल घेऊन जाण्यासाठी खळ्यावर हजर झाले त्या वेळी डेबूजीने स्पष्टच सांगितले की, आता पावती दिल्याशिवाय माल देणार नाही. डेबूजी अशिक्षित होता तरी त्याचे व्यावहारिक ज्ञान सखोल होते. आपण सावकाराला किती रक्कम दिली, किती ज्वारी दिली याचा

हिशेब त्याच्याजवळ होता. कागदावर नाही तर त्याच्या ओठावर. सावकाराने डेबूजीला बोलावणे पाठविले. त्याने स्पष्टपणे सावकाराला सांगितले की, आता कुठलेच देणे आपल्याकडे नाही, पूर्ण रक्कम फिटली.

पण तिडके सावकार काही साधासुधा माणूस नव्हता. चंद्रभान कोळसकराची जमीन आपल्या ताब्यात घ्यायची असे सावकाराने मनाशी ठरवले. फार वर्षांपूर्वी पूर्णाकाठचा पंचवीस एकराचा पिकाऊ पट्टा सावकारांनी मामाला विकला होता. त्याचे पूर्ण पैसेही देऊन झाले होते पण मामांनी काही कागदपत्र करून घेतले नव्हते. सगळा विश्वासाचा कारभार. सावकाराने त्याच शेताकडे आपली नजर वळविली. कोर्टात रीतसर अर्ज करून कायद्याने जमिनीचा ताबा मिळाल्याचे पत्र मिळविले. कोर्टामार्फत जप्तीचे वॉरंट पाठवून कब्जा घेण्याची तारीख ठरविली. ते पत्र बळीरामच्या नावे दापुऱ्याला पोहोचले. डेबुजीला कोणीतरी ते वाचून दाखविले. ते ऐकताच त्याचे डोळे त्वेषाने लाल झाले. कोळसकरांच्या घरावर आकाश कोसळले. 'सावकाराशी हमरीतुमरी करण्याचे हे फळ आहे. लहान तोंडी मोठा घास डेबूजीने घेतला नसता तर अशी वेळ आलीच नसती' असे गावचे लोक एकमेकांना म्हणू लागले.

कब्जाचा दिवस जसाजसा जवळ येऊ लागला तसतसे घरातले वातावरण तापू लागले. घरचे सर्व लोक सावकाराला कब्जा द्यायचा या मताचे. पण तरण्याबांड डेबूजीने सावकाराला शेताचा कब्जा घेऊ द्यायचा नाही असे ठरविले. जीवात जीव आहे तोपर्यंत मामाच्या शेतात दुसऱ्याचा वखर चालू द्यायचा नाही असा निर्धार डेबूजीने केला. "आपण कुठंही काम करू अन् खाऊ. जमीन जाईल तर जाईल, तुम्ही जगले तर आणखी कमावून घ्याल, पण कुणाशी भांडण करू नको." असा सल्ला आजोबा, आजी, आई या सर्वांनी दिला. डेबूजी सगळ्यांचे ऐकत होता पण त्याचा निर्धार पक्का होता.

कब्जाचा दिवस उजाडला. डेबूजी भल्यापहाटे वखर घेऊन शेतात गेला. उन्हाळ्याचे दिवस होते. वखरन करता करता त्याच्या मनात कालवाकालव होत होती. त्याचे डोळे रस्त्याकडे वळत होते. काठी टेकीत आजोबा आले, त्यांच्यामागून आई, आजी, मामी, बळीराम सारे आले. सावकार गावातून वखर आणि चारपाच जाट, गावचे काही महार सोबत घेऊन येत आहे, असे बळीरामने सांगितले. डेबूजी काही बोलला नाही. परंतु आजा-आजी त्याला वखर सोडून देण्यास विनवीत होते. इतक्यात चार-पाच वखरं शेतात येऊन पोहोचली. घोड्यावर बसून तिडके सावकारही आला. त्याच्यामागे गावातले पाचपन्नास बघे, शिवारातले दहा-वीस कास्तकारही जमा झाले. शेतात पोहोचताच वखरं शेतात धरण्याचा हुकूम सावकाराने दिला आणि त्या शांत रानात आवाज घुमला, "खबरदार!" सर्व औतकरी जागच्याजागी उभे

राहिले. जाट आणि महारही त्या आवाजाने हादरले. इतक्यात घोड्यावर बसलेल्या सावकाराने पुन्हा हुकूम दिला, "अरे चालवा वखर, काय करतो तो डेब्या?" एका बाजूला पैसा आणि दुसऱ्या बाजूला सत्य उभे राहिले. सावकार पुन:पुन्हा सोबत आणलेल्या जाट-महारांना हुकूम देत होता, पण कुणीच पुढे धजेना. त्यांना डेबूजीच्या मजबूत देहयष्टीची आणि शक्तीची कल्पना होती. एकटा डेबूजी चार लोकांना भारी आहे हे त्यांना माहीत होते. तरीही एक महार डेबूजीला धरायला पुढे धावला. डेबूजी त्याला म्हणाला, "मी त माह्या घरच कुंकू पुसून आलो आहो. तूहा इचार कर!" तरीही तो डेबूच्या अंगावर धावलाच. त्याला पाहताच दुसराही धावला, तिसराही धावला. दोघांनी डेबूजीच्या बगलेत हात घालून घट्ट धरून ठेवले. तिसरा आता मारणार इतक्यात डेबूजीने दोघांना हिसका देऊन खाली पाडले व तिसऱ्याच्या कंबरेत लाथ घालून त्याला जमिनीवर लोळवले. मग एखाद्या वाघासारखा हातात काठी घेऊन तो सावकाराच्या अंगावर धावला. डेबूचा तो त्वेष, आवेश पाहून सावकार घाबरला आणि त्याने आपला घोडा वळविला. इतक्यात डेबूजी तेथे पोहोंचला होताच. हातातील काठीचा एक जोरदार रट्टा घोड्याच्या पुठ्ठ्यावर बसलाच. घोडा भरधाव पळत गावाकडे निघाला. सावकारच पळाला तर मग औतंकरी आणि भाड्याने आणलेली माणसे कशी थांबतील? तेही आपला जीव वाचविण्यासाठी पसार झाले.

सावकाराला डेबू वठ्ठ्याने चांगला धडा शिकविला, सावकार पळून गेला ही बातमी साऱ्या पंचक्रोशीत पसरली. जो तो तारीफ करू लागला. पण त्याच वेळी सावकार आता पोलिसाकडे तक्रार करील, डेबूजीला अटक होईल असे सर्वांना वाटू लागले. पाचसात दिवसानंतर या प्रकरणाचा शेवट काही मध्यस्थांच्या मदतीने सावकारानेच केला. मध्यस्थांनी हंबराजीची भेट घेतली, बळीरामालाही विश्वासात घेतले आणि पंधरा एकर जमीन देऊन हे प्रकरण निकालात काढले. बळीरामला छप्पन एकरापैकी फक्त पंधरा एकर जमीन मिळाली होती आणि एकेचाळीस एकर जमीन तिडके सावकाराच्या घशात गेली होती. हा सगळा व्यवहार डेबूजीच्या मागे झाला. घरच्यांनी केलेल्या या व्यवहाराचे त्याला फार दुःख झाले.

## घरादाराचा त्याग

'सावंगी दुर्गड्याच्या तिडके सावकाराला दापुऱ्याच्या वठ्ठ्याच्या पोराने शेताचा कब्जा न देता पळवून लावले' ही बातमी आसपासच्या पाचपन्नास खेड्यांत पोहोचली. लोक डेबूजीच्या हिमतीविषयी आदराने बोलायला लागले. लोक डेबूला मर्द म्हणत होते पण आजोबाने सावकाराशी समझोता केल्यामुळे तो सर्द झाला होता. आपण मामाची जमीन सावकाराच्या ताब्यातून सोडवून बळीरामच्या स्वाधीन केली असती

तर इतर शेतकऱ्यांनाही आपल्या जमिनी सोडवून घेता आल्या असत्या असे त्याला वाटत होते, परंतु त्याची ही आशा आता गेली व निराशा वाढायला लागली. शेतीचे काम करण्यात त्याचे मन लागेना, घरातही लक्ष नव्हते. डेबूजीला दोन मुली होत्या. एक आलोका, दुसरी कलावती. तिसरा मुलगा झाला. त्याचे नाव ठेवले मुद्‌गल. मुलीच्या बारशाचा प्रसंग उभा राहताच डेबूजीने आपला निर्णय सर्वांना सांगितला,

"आपल्या घरी बकरेबिकरे कापाचे नाई. दारूचा एक थेंबई या घरात आनाचा नाई."

हंबीरराव म्हणाला, "मंग? बारसं कसं करावं?"

"पोरीच्या जन्माच्या वख्ती बकरं कापवं् लागते, हे कोन्या शासतरात लेहलं?"

"अरे, मंग आजवर रीत चालत आली थे?"

"रीती भल्याई आसतात, बुऱ्याई आसतात. रीती आपल्यालेच सुधाराव लागतेत."

"पन सोयरे अन् जातवाले काय म्हनतीन्?"

"त्याहिले मटनाच्या जागी लाडू घाला, थे खूस होतीन."

डेबूजीने आपल्या मनासारखे केले. लाडूचा स्वयंपाक केला. सगेसोयर, जातवाले जमले. मटनही नाही आणि दारूही नाही हे पाहून सगळेच नाराज झाले. जो तो डेबूजीसोबत वाद घालू लागला. डेबूजी म्हणाले, "हे पहा, लेक जलमली, हे आनंदाची गोट का दुखाची?"

"दुखाची कशी अशीन्?"

"मंग आपला आनंद बकरीच्या पिलाले दुख देऊन साजरा करावा काय?"

"देवानं बकरे का बा केले असतीन्?"

"थे देवाचं देव पाहून घील. मले झालेला आनंद मले गोडाधोडानं साजरा करांचा हाये."

"आन् मंग दारू?"

"दारू पेऊन कोनाचं बरं झालं थे सांगान् काय?"

"आतापर्यंत पेत आले थे?"

"कोन्ती गोष्ट आतापर्यंत चुकत आली त थे सुदारली पाह्यजे. त्याले शहानपना म्हंतत. दारू पेऊन झोकांड्या खानं याले कोनता शहानपना म्हनावं्?"

पण दारू प्यायला चटावलेले सगेसोयरे अडून बसले. डेबूजी त्यांच्याशी नाना प्रकारे युक्तिवाद करायला लागले तरी ते ऐकेनात. शेवटी डेबूजी संतापले. त्यांनी आपला निर्णय सांगितला. मी लाडू केले आहेत. ज्यांना जेवायचे असेल त्यांनी जेवावे. नसेल त्याला रामराम. काही शहाणे जेवले, काही उठून चालते झाले. अशा गोंधळात

बारशाचा समारंभ साजरा झाला. मुद्गल सहा महिन्याचा असतानाच वारला. 'याने देवाला बकरे कापले नाही म्हणूनच पोरगा मेला' असे लोक म्हणू लागले. पण डेबूजीला त्याचे काही वाटले नाही. आता चौथ्यांदा कुंताबाई गर्भार होती. दोन-तीन महिने झाले असतील.

डेबूजीला लोकांना अन्यायाचा प्रतिकार करा, कर्ज काढून संसाराचे वाटोळे करून घेऊ नका, दारू पिऊन घरदार उद्ध्वस्त करू नका असे सांगावेसे वाटत होते. शेतकऱ्याच्या पिवळणुकीविरुद्ध आवाज उठवावा असे वाटत होते. पण त्याच्या शब्दात तेज आणि ओज होते कुठे? वाणीला सामर्थ्य येण्यासाठी निश्चयाचे बळ आणि त्यागाचे पाठबळ असावे लागते, कर्तृत्व असावे लागते. डेबूजीजवळ यापैकी काहीही नव्हते; फक्त एक सच्ची आंतरिक तळमळ होती. गोरगरिबांचे दुःख पाहून द्रवणारे मन होते.

डेबूजी सतत विचार करायचा. तो हळूहळू संसारातून निवृत्त होत होता. तासन्तास एखाद्या ठिकाणी बसून राह्यचा. संध्याकाळी जेवण झाल्यावर मारुतीच्या ओट्यावर जाऊन एकटाच विचार करीत बसायचा. घरात कुणाशी फारसा बोलत नव्हता. ताटात वाढले ते खायचा आणि झोपी जायचा. झोप तरी कुठे लागत होती? फक्त विचार.

डेबूजीला घरातून निघून जावेसे वाटे. दापुरे गावच्या परिसराला तो विटला. स्मशानातील बागेत असलेल्या समाधीतल्या व्यक्ती जणू त्याला बैरागी व्हायला सांगत होत्या. एका कुटुंबाची काळजी करीत आयुष्य घालविण्यापेक्षा तू विश्वाची काळजी कर, रंजल्यागांजल्यांची आई हो, भुकेल्याच्या तोंडी चार घास घाल, कुडकुडणाऱ्याच्या अंगावर एखादे वस्त्र घाल. साऱ्या विश्वाची आई हो असेच जणू त्या डेबूजीला सांगत होत्या. डेबूजीलाही तसेच वाटत होते. बोलणे सोपे असते पण करणे फार कठीण. जे लोक विशिष्ट ध्येयाने वेडे होतात तेच क्रांती करू शकतात. स्वतःच्या घरावर तुळशीपत्र ठेवणारेच जगाचा संसार चालवू शकतात, लोकांना मार्ग दाखवू शकतात. तेव्हा त्यांच्यामागे सारे येते. मान येतो, कीर्ती येते, पैसा येतो.

एक दिवस सरळ घरी येऊन डेबूजी आपलं चोणकं शोधू लागले. एका ढोलीत ते सापडले. त्याची तार काढली, कुठूनतरी एक भोपळा मिळवला आणि तंबोरा केला. त्या दिवसापासून ते वेड्यासारखेच करू लागले. तंबोरा घेऊन वाजवीत वाजवीत गुंजारवाड्याला गेले. तेथून सावंगीला, सिरध्याला, तेथून आंमला-कळशीला. ते सारखे आठदहा दिवस फिरत होते. इकडे सखूबाई त्यांचा शोध घेत होती. आज या गावी दिसला, काल त्या गावी होता असे लोक सांगत होते. तरणाताठा पोरगा पागल झाला असे वाटून ती रडू लागली. सात-आठ दिवसांनी तंबोरा वाजवीत वाजवीत डेबूजी घरी आले. सगळ्यांना फार आनंद झाला. पत्नीने रडून आकांत केला,

मुली गळा पडू लागल्या, आई टाकून बोलली. पण कशाचाच परिणाम त्याच्यावर झाला नाही.

रात्री देवळासमोर कीर्तन होते. डेबूजी कीर्तनास जाऊन बसले. कीर्तनकार सांगू लागले, "मृत्यू लहान-थोर ओळखत नाही. त्याच्यापाशी श्रीमंत-गरीब हा विचार नाही. हा हिंदू, तो मुसलमान हा भेद नाही. तो प्रत्येकाला उचलतो. तेव्हा तो येईपर्यंत प्रत्येक क्षणाचा उपयोग करून घ्या! समाजाची सेवा करा!" कीर्तनकाराचे हे नेहमीचेच होते पण ते बोलणे मात्र डेबूजींना झोंबले.

भगवान तथागत बुद्धाला जेव्हा मृत्यू हे सत्य दिसले त्याक्षणी तो चिरंतन शांतीच्या शोधासाठी बाहेर पडला. एक युगपरिवर्तन झाले. तीच आग डेबूजीच्या अंत:करणात लागली.

कीर्तन संपले. लोक उठून चालते झाले. डेबूजीही घरी आले. कुंताबाई झोपल्या होत्या. त्यांच्या शेजारी आलोका आणि कलावती. तीन महिन्यांचा गर्भ कुंताबाईच्या उदरी वाढत होता.

रात्र संपू लागली. बराच वेळपर्यंत डेबूजी खांबाला टेकून विचार करीत होते. पूर्वेला तांबडे फुटू लागले. डेबूजी बाहेर आले. त्यांनी पूर्वेकडील आकाश पाहिले. एक निश्चय पक्का झाला. ते पुन्हा आत गेले. सगळे घर गाढ झोपेत होते. डेबूजींनी अंगातील सदरा काढला. फाटके कुडते अंगावर चढवले. चांगले धोतर सोडून जुने नेसले. अंगणात एक गाडगे पडले होते ते त्यांनी उचलले. पलीकडे एक काठी पडली होती, तीही उचलली. सर्वांवर एकवार नजर टाकून ते बाहेर पडले. पुन्हा परत न येण्यासाठी.

पुन्हा एकदा बुद्धाने लोकांसाठी जन्म घेतला.

## जगाचे निरीक्षण

डेबूजी घराबाहेर पडले. त्याच दिवशी चालवेल तितके चालून त्यांनी दापुरे मागे टाकले. यानंतर जन्मभर चालण्याचेच व्रत स्वीकारले. नक्की दिशा अशी नव्हतीच. कोणत्याही खेड्यात जावे, देवळात नाही तर रानात मुक्काम करावा. भूक लागली की कुणाच्या तरी दारी उभे राहावे व हाळी द्यावी 'भाकर वाढ वो माय!' त्यांचा असा अवतार पाहून घरमालकिणीने शिव्या द्याव्या. 'एवढा अंगाने दिसतो, काम करता येत नाही! फुकटचे खायला पाहिजे' असे म्हणावे. मग डेबूजीने तिला काम विचारावे. गाडाभर लाकडे फोडून द्यावी. बाई घरात भाकर आणायला गेली की हळूच कुऱ्हाड ठेवून पसार व्हावे. तिने अचंब्यात पडावे. एखाद्या कुंभाराच्या घरी जाऊन गाडगे मागावे. त्याने म्हणावे फुकट कसे देऊ? मग त्याच्या घरी काम करू लागावे. माती आणावी, लीद फोडावी, चिखल करू लागावा. असे दिवसभर काम करावे. कुंभार

घरी जेवायला गेला की डेबूजीने पसार व्हावे. कुंभार त्यांच्यासाठी भाकरी घेऊन येई तर हा गडी मोबदला न घेताच पसार. एखाद्या शेतकऱ्याच्या बांधावर उभे राहावे आणि त्याला म्हणावे, "एक पेंढी देता?"

"तुह्या बापानं ठेवली हाय काय?"

"मंग पाच पेंढ्या द्या!"

शेतकऱ्याने रागवावे. तेव्हा डेबूजीने म्हणावे, "फुकटात नका देऊ, काम करून घ्या." शेतकऱ्याने म्हणावे, "माझ्या बाभळीच्या काट्या तोडायच्या आहेत." शेतकऱ्याने कुऱ्हाड द्यावी, बाबांनी सरसर बाभुळीवर चढावे. अशा काट्या तोडाव्यात की त्यानेही तोंडात बोटे घालावी. हा वेडापिसा माणूस उत्तम काम करू शकतो हे त्याला पटावे. शेतकऱ्याने म्हणावे, "माझ्याकडे कामाला राहतोस?" तेव्हा यांनी दहा लाख रुपये पगार मागावा. शेतकरी भाकरी आणायला गेला की यांनी पसार व्हावे.

कधी ही गोष्ट एवढ्यावर थांबत नसे. चांदूर बाजारची गोष्ट आहे. तिथे बाजीराव काकडे पाटलाचा भलाथोरला वाडा. घरी पिढीजात श्रीमंती. डेबूजी एक दिवस आपल्या नामांकित वेषात–अंगावर फाटके कुडते, कंबरेला लुंगी, डोक्यावर चिंध्या, हातात गाडगे, डोक्यावर जटा वाढलेल्या असे – वाड्याच्या दारातून आत शिरले व हाक मारली, "आई, अन्न वाढा!"

एक बाई हातात भाकरी घेऊन आली. तिच्या हातातली भाकरी पाहून डेबूजी म्हणाले, "भाकरीच आनली. घरात वासत पुरनपोळ्याचा येऊन राह्यला!"

बाई बडबडत माघारी फिरली आणि आतून रागाने तांबडेलाल झालेले बाजीराव पाटील आले. हातात आसूड होता. पाटलाने विचारले, "काय पाह्यजे तुले?"

"पुरनपोळ्या!"

त्याच क्षणी आसुडाचा एक जोरदार फटका पाठीवर पडला. पुन्हा विचारले, "काय पाह्यजे तुले?"

"पुरनपोळ्या!"

प्रश्न तोच, उत्तरही तेच. फक्त प्रत्येक वेळी आसुडाचा फटका. मारून मारून पाटील अगदी थकून गेले पण प्रत्येक वेळी डेबूजीने तेच उत्तर द्यावे. भोवताली लोकांची गर्दी जमली. लोक म्हणू लागले, "भिकारी तरी किती मुजोर पहा. पुरनपोळ्याच मागतो." शेवटी पाटलाने अंगणात ठेवलेल्या काट्याच्या फासातून एक काठी उपसली आणि तिने झोडपण्यास सुरुवात केली. डेबूजीचे अंग रक्ताने न्हाऊन निघाले. अंधारात एका पडक्या ओसरीवर बसून डेबूजी अंगातील काटे काढत होते. चांदूरच्याच पांडुरंग गुमळ नावाच्या सोनाराने ते पाहिले. त्याला सहानुभूती वाटली. त्याने विचारले, "कोण आहे तू?"

"मी!"

"अरे पण काही नावगाव नाही का तुला?"

"नावगाव मले मालूम नाई!"

"कन्हून का राहिला?"

"काई नाई. पुरनपोळ्या खाऊन राह्यलो!"

कुण्या खेडेगावात देवळात मुक्काम करावा. देवळात अंधार, कुबट वास. जिकडे तिकडे घाण साचलेली. डेबूजीने ती पाहावी. शेतात जाऊन तुराट्या गोळा कराव्या. एखादी चिंधी पाहून त्याचा खराटा करावा. देऊळ, आजूबाजूचा परिसर स्वच्छ झाडून काढावा. त्यानंतर गावातल्या गल्लीबोळी झाडून काढाव्या. हाताने नाला साफ करावा, गटारं मोकळी करावीत. कुणातरी मायबहिणीला दया येई. तिने भाजीभाकर आणावी. डेबूजीने ती गाडग्यात घेऊन खावी. गाव का स्वच्छ केला, असे कुणी विचारले तर "रात्री देवळात कीर्तन आहे" असे उत्तर द्यावे. कीर्तन आहे असे ऐकल्यावर कुणीतरी रात्री ग्यासबत्ती घेऊन देवळात यावे. गावातल्या भजनी मंडळींनी पेटी-तबला घेऊन यावे आणि डेबूजीला विचारावे,

"कीर्तनकार बुवा कुठे आहेत?"

यांनी उत्तर द्यावे, "थे आले नाईनं. मलेच पाठवलं त्यायनं." सर्व मंडळींनी हसावे. टिंगल उडवावी. आलोच म्हणून थोडा वेळ भजन करावे आणि निघून जावे. ग्यासबत्तीवाल्याने आपली बत्ती न्यावी. मग डेबूजीने दोन दगड हातात घेऊन भजन म्हणण्यास सुरुवात करावी.

*गोपाला, गोपाला*
*देवकीनंदन गोपाला*
*सांभाळी ही तुझी लेकरे*
*पुण्य समजती पापाला–*

झोपलेल्या लोकांच्या कानी हा गोड भरदार आवाज पडला की त्यांनी सावध व्हावे. या भिकाऱ्याचा एवढा भरदार आवाज? मग हळूच एकदोन लोक यावे. त्यांच्या पाठोपाठ दहाबारा. हळूहळू सारा गाव जमा होई. मग डेबूजीच्या वाणीला पाझर सुटे. ते सांगू लागत,

— कर्ज काढून देवाची यात्रा करू नका.

— गाईबैलांची चिंता वाहत जा.

— मुलांना शिकविल्याविना राहू नका.

— देवाला नवस करून कोंबडी-बकरी मारू नका.

— आईबापांची सेवा करा.

— कर्ज काढून दिवसवारे करू नका.
— भुकेल्याला अन्न द्या.
— हुंडा घेऊन-देऊन लग्ने करू नका.
— शिवाशिव पाळू नका.
— दारू पिऊ नका.
— देवाचे भजन केल्याशिवाय राहू नका!

हे सगळे तर आपणास अगदी कळण्याजोगे आहे हे लोकांना समजायचे. या भिकाऱ्याचा वेष गबाळा असला तरी हा ज्ञानी आहे, अंतःकरणात तळमळ आहे, आवाजात हुकूमत आहे हे लोकांमध्ये पसरायंला लागले. हा वेडापिसा माणूस नसून लोकांच्या कल्याणासाठी अंतःकरणपूर्वक झटणारा महात्मा आहे, हे जाणवू लागले. डेबूजी वट्ठ्याला आता लोक डेबूजी बुवा म्हणू लागले. गाडग्याने पाणी पिणारा, सदैव हातात गाडगे वागवणारा म्हणून 'गाडगे महाराज' म्हणू लागले, तर कुणी त्यांना 'चापरे महाराज' तर कुणी 'गोधडे महाराज' म्हणू लागले.

सतत बारा वर्षे बाबांनी भ्रमण केले. या कालखंडात ते देशभर सर्वत्र फिरले. समाजजीवनाचे व रूढी-परंपरांचे सूक्ष्म अवलोकन केले. एक अक्षरही न शिकलेल्या या माणसाने आपले सारे ज्ञान जगाच्या पाठशाळेतून घेतले. समाजाची उन्नती हे आपले ध्येय ठरवले. आणि त्यासाठी साधन निश्चित केले ते झाडू.

गाडगेबाबांचे नाव चोहो दिशांनी पसरू लागले. गाडगेबाबांचे कीर्तन आहे असे ऐकल्यावर हजारोंचा जमाव जमू लागला. त्यांचे कीर्तनही वेगळेच असे. बाकीच्या कीर्तनकारांप्रमाणे ते माया, ब्रह्म, स्वर्ग, मृत्यू याविषयी न सांगता, लोकांच्या दैनंदिन जीवनाबद्दल बोलत. लोकांच्या जीवनातील दंभ-ढोंगावर जोरदार प्रहार करीत त्यांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालत. हे करताना त्यांनी कोणतीही भीडमूर्वत ठेवली नाही. ते म्हणत, 'मंडळी, मी अडानी मानूस! मले भजन काय कळते. शिक्षनाचा गंध नाही. लोकांचे कपडे गोळा करावं, ते धुवावं, भाकरी मागावं् अन् पोट भरावं् हा माझा धंदा. पन तुमी संत मंडळी जसे चंदनाचे झाड! चंदनाच्या संगतीनं बोरीबाभळींनाही वास लागते.

*संतानी सरता केलो तैशापरी ।*
*चंदनांनी बोरी व्यापियेल्या ।।*

'तसी तुमा मायबापांची सेवा केली, आनि तुमी मले भजनकऱ्याची बुद्धी दिली.' अशी जमल्या मंडळींची बाबांनी स्तुती करावी. मंडळींना तेवढेच बरे वाटे. ते निष्ठेने अडकू लागत आणि मग हळूहळू पोटात शिरून त्यांना न बोचेल, न जाणवेल, अशा रीतीने त्यांच्या वैगुण्यावर बोट ठेवावे.

— ज्यानं हे पुर्थई पैदा केली, हे आकाशाचं छत वर टांगलं, त्यांत चांदन्या लटकावून दिल्या, ज्यानं आपल्यासाठी पाऊस पैदा केला, थो देव एक आहे की दोन?

आता मंडळी कोड्यात पडत. पण काहीतरी उत्तर द्यावेच लागे. चार-दोन जण हळूच म्हणत,

— एक!

बाबांनी हसत म्हणावे,

— कबूल कऱ्याची लाज का बा वाटते? मोठ्यानं सांगा. मग मंडळींचा आवाज घुमे,

— एक ऽऽ!

— पाह्यजा बरं! नाही तर मंग भुलाल, नीट विचार करून सांगा. देव किती?

— ए ऽ ऽ क!

— हां! आता हिशेब करा. तुमच्या गावात खंडोबाचं देऊळ आहे का नाही?

— आहे!

— मंग देव किती झाले?

फजीत पावून मंडळी म्हणत,

— दोन!

— तुमच्या वावरांच्या बांधावर म्हसोबा असतात का नाही?

— असतात!

— मंग देव किती झाले?

— तीन

— तुमच्या गावाच्या शिवेवर मरीमाय येऊन बसली का नाही?

— बसली!

— मंग देव किती झाले?

— चा ऽ र!

— मातामायची पुंजा करता का नाही?

— करतो.

— मंग देव किती झाले?

— पा ऽ च!

अशा रीतीने विनोबा, वेताळ, फेताळ, मैराळ, जाखाई, जोखाई, येसकाई सगळ्या देवांची यादी बाबांनी ऐकवावी.

बाबांचे कीर्तन हे असे प्रश्नोत्तरूपी असे. ते सगळ्या समुदायाला कीर्तनातला

एक घटक करून घेत. त्यांच्या कीर्तनामध्ये पेंगायची अजिबात सोय नसे. असा सगळा समूह प्रश्नांना उत्तरे देऊ लागला की अचानक बाबा त्याच्यावर कोसळत,

— देव बारा-पंधरा झाले का नाही?

— झाले!

— बरं! इतल्यानं तुमचं भागत नाही. पिराले नवस करता का नाही?

— करतो!

— मीया लोक ताबूत काहाडतात, त्यांच्या खालून चालता का नाही?

— चालतो!

— आ? अन् मंगाशी देव एक म्हंताखेपी तुमची बुद्धी काय वान्याकडे गहान पडली होती काय? जमाव एकदम चमके. खडबडून जागा होई. त्या समूहात दिवसा ज्याने भाकरी देऊ करून बाग स्वच्छ करून घेतली होती, तोही कदाचित असे. तो नवल करी, की ज्याने पैसे नाकारले होते, हाच तो भिकारी! मग सगळ्यांच्या मतिबुद्धी सजग होत. ते लक्ष लावून ऐकू लागत. बाबा म्हणत,

— बरं! या देवांना नवस करता की नाही?

— करतो!

— अस म्हंता का नाही, का देवा माझं पोरगं आजारी पडलं. याले बरं कर. तुले एक बकरू कापीन?

— म्हनतो!

— असं सांगता का नाही, का तुले चार पायाचं वाहीन, तू हे दोन पायाचं सोडून दे!

— सांगतो!

— का बा? देवाले काय चार पायाचं करडू लागते काय? अन् ज्यानं पुर्थई पैदा केली, थो देव इतला लालची, लाचखाऊ आहे काय? असा कसा तुमचा देव! घेतो बकऱ्याचा जीव!

— थो काय साहेबाघरचा चपराशी आहे काय, का बुवा हे शेरभर वांगं घे, अन् साहेबाची माझी गाठ घालून दे.

— नाही!

— अरे, ज्यानं हे जग पैदा केलं, त्याले लालूच दाखवता? बरं, देवाले बकरू कबूल केलं, आन् तुमचं काम झालं. तर मंग देवाच्या नावानं बकरू सोडून द्याव्! थो कापून खाओ, कच्चं खाओ, तसंच चरायला देओ! खरं का नाही?

— बरोबर.

— आ? मग तुमचे मसाले वाया जातीन ना!

— देवाच्या यात्रेला जाता. एक बैलगाडी. तीत सगळ्या साळकाया माळकाया भरलेल्या. सखूबाई-बकूबाई-ठकूबाई-चिंगूबाई! अन् त्या बैलगाडीच्या मागे थे बिचारं बकरू बांधलेलं. बैलगाडी जोरात चालली, की तेही धावते. त्याले बिचाऱ्याले काय माहीत का आता आपली घटका भरली आहे.

— देवापाशी पोचता. पाटेवरवंटे गाडीतून काढता. मसाल्याच्या पुड्या सोडता. साळकाया माळकाया मसाले वाटायला भिडतात. ज्या पोरासाठी बकरूं कबूल केलं, ते लहानसं पोरगं खांद्यावर घेता. त्याच्या भोवती नीट पांघरून गुंडाळता. त्याले वारा लागू नये. त्याले उन्ह लागू नये. आन् त्याले देवाच्या पायांवर घालता. मग बकरू ओढीत देवासमोर आनता. आनता का नाही? बोला!

— आनतो ऽऽ!

— आ? इतली तुमच्या पोटात दया, का पोराले वारा लागू नोय् म्हणून जपता! आन् इकडे कसाई आपला सुरा पाळजीत असते. त्याले धार लावीत असते.

— तुम्ही हुशार इतले असता, का बकरू कापल्याचं पाप कसायाच्या डोक्यावर! कापायला कसाई! खायला तुमी! आ?

— तो कसाई सुरा हाती घेऊंन उभा राहते. त्या बकऱ्याले आपलं मरन् दिसू लागते. थे आकान्त करून ओरडं लागते. तुम्ही त्याले तसंच ओढता. म्हन्ता, का येत नाही? घाल साल्याच्या पाठीत एक लाथ! म्हन्ता का नाही?

— म्हनतो!

— अन् त्याले देवासमोर खाली पाडता. त्याची मान धरून पिरगळता. त्यावर कसायाची सुरी चराचरा चालते. मुंडकं अलग. रक्ताचा इथून तिथवर पाट वाहतो. वाहतो का नाही?

— वाहतो.

— आन मंग रक्ताचे पाच बोटं देवाच्या अंगावर उठवता. थे बकरू सोलता. कापता. तुकडे करता. शिजवता. मग पंगत जेवायले बसते. भिकोबा, गंगोबा, सखाराम, तुकाराम, बकाराम, आग्रह करून करून वाढता. पोटाला तडस लागतोवर नळ्या ओरपता! बोला!

— हो ऽऽ!

— आन् घरी निगताना देवाले म्हंता, का देवा, आमचं आनि पोराचं कल्यान कर!

— देव कल्यान करील तुमचं? थो सत्यानास करील! बाबांचा आवाज चढलेला असे. तळमळून ते बोलत. श्रोत्यांच्या मनी चर्र होई.

— अरे, देवाघरचं एक बिचारं कापून खाल्लं, आन त्याले पुन: कल्यान कऱ्याले

सांगता? तुमचं कधी बरं होनार नाही!

बाबा भजन सांगत,

*राम राम राम सीता ऽ राम राम राम!*

चकित आणि लज्जित समूह मुकाट्याने भजन करू लागे. राम राम राम सीताऽ राम राम राम! असा तो सगळा जमाव आपल्या ताब्यात आला आहे, असे जोखून बाबा पुढे बोलू लागत.

— बरं! जे लेकरूं बरं व्हावं म्हनून देवापुढं बकरू कापलं, थे पुन्हा आजारी पडते. जे आजारी पडलं त्याले डॉक्टरकडे न्यावाव्, का अंगारेधुपारे कराव्?

— त्याच्या तब्येतीचं डॉक्टरला कळते, का देवऋषाले कळते?

— डॉक्टरला!

— नाही तुमी त्याले देवऋषीकडे नेता?

— तो देवऋषीही भल्ला बह्याड! त्याच्या अंगात म्हने देव येते. महिना महिना ह्या आंघोळ करीत नाही. त्याच्या अंगावर, कपड्यातून दरादरा उवा धावतात. आन् ह्या देव आल्यांन घुमते!

इथे बाबा हुबेहूब देवऋषासारखे घुमून दाखवीत. हासून हासून लोकांच्या मुरकुंड्या वळत. घुमून झाल्यावर बाबा पुढे सुरू करीत.

आता त्याले देवऋषाकडे न्या, का भगताकडे न्या! येका रोजी थे इतलसं लेकरूं डोळे मिटते! मंग उसळते रडायचा कल्लोळ! आयाबाया जमतात. त्या आरडू लागतात.

— आता काय करू ग ऽ बया!

— आता त्याले कोठी पाहू ग ऽ बया!

— काल परवा तर दुडुदुडु धावत होता ना ग ऽ बया!

बाबा हे सगळे त्या बायांच्या सुरांत म्हणून दाखवून मग मिश्कीलपणे म्हणत,

— बकरूं कापलं त्या वख्ती - नथीला झटके देऊ देऊ तूच मसाले वाटीत होती ना गे ऽ बया!

पुन्हा हशाचा गदारोळ उठे. खरोखरी आपण हे फार मोठे गाढवपण करीत असतो, असा निश्चय त्या समूहाच्या मनी बळावे. त्यानंतर एकदा सामूहिक भजन होई.

राधा ऽ राधा कृष्ण राधा

अशी बाबांची कीर्तने रंगू लागली. शेकडो-हजारो लोकांमध्ये गाडगेबाबांचे कीर्तन हा जादूचा शब्द झाला. तो ऐकताक्षणी लोकांचे थवेच्या थवे कीर्तनाच्या दिशेने वळू लागले. कीर्तन संपल्यावर पाया पडायला लोक धावत. कीर्तनकाराच्या पाया पडणे हा तर रिवाजच होता; पण बाबा कुणाला पाया पडू देत नसत. माझ्या पाया

पडण्याऐवजी झाडू घेऊन झाडायला लागा असे विनवीत. लोकांना नवल वाटे.

भ्रमण करीत असताना समाजजीवनाचे निरनिराळे पैलू बाबांच्या दृष्टीस पडले होते. जिकडे तिकडे सावकारशाहीने थैमान घातले होते. शेठ-सावकारांनी लोकांच्या हजारो एकर जमिनी गडप केल्या होत्या. जिकडे तिकडे दु:ख-दारिद्र्य आणि कर्जबाजारीपणा यांनी थैमान घातले होते. काबाडकष्ट करणारा शेतकरी उपाशी मरत होता आणि कोणतेच काम न करणारे सावकार गाद्यागिरद्यांवर लोळत होते. जातीयतेने सगळा समाज पोखरून काढला होता. महार, मांग, चांभार यांचे जगणे मुश्कील झाले होते. बाबा एखाद्या शेतकऱ्याच्या विहिरीवर जात आणि त्याच्याकडे पाणी मागत. तो म्हणायचा, 'तुला हात नाहीत का? काढ आणि पी.' बाबा हळूच म्हणत, 'मी मांग व्होये.' मग पुन्हा मार बसे. अशा तऱ्हेने जातीयतेचे दु:ख बाबांनी स्वत: भोगले.

डेबूजीने आपल्या बालपणी ग्रामदेवतेची पूजा पाहिली होती. दैतोबा, खंडोबा, म्हैसोबा, मरीआई या देवतांना प्रसन्न करण्यासाठी दिलेले पशुबळी पाहिले होते. बकऱ्याचा तो केविलवाणा आवाज, कापणाऱ्याचे रक्ताने बरबटलेले हात गाडगेबाबा अजून विसरले नव्हते. आता तर ते गावोगाव भटकत. ठिकठिकाणच्या यात्रेत हजारो कोंबड्या-बकऱ्यांचे बळी पडत. बाबा उपराई गावच्या शादलबुवाच्या यात्रेत गेले. तेथे दर गुरुवारी पंधराशे बकऱ्यांचे बळी देण्यात येत असल्याचे दिसले. पूर्णामायचे सगळे पाणी लाल होऊन जाई. अकोला जिल्ह्यातील दोनद, जळगाव जिल्ह्यातील वडदा, सोलापूर जिल्ह्यातील मरीआई, मराठवाड्यात वाखरीला सटवाई, नाशिक जिल्ह्यात चंदनपूरचा खंडोबा या साऱ्या देवतांपुढे प्राण्यांचे बळी जात. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील बहुजन समाज ह्या ग्रामदेवतेच्या पाठीमागे बळी जात. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील बहुजन समाज ह्या ग्रामदेवतेच्या पाठीमागे लागून मुक्या प्राण्यांची हत्या करीत होता आणि नैवेद्य म्हणून मटणावर ताव मारीत होता. तीर्थ म्हणून दारू प्राशन करीत होता. हे बाबांनी उघड्या डोळ्यांनी पाहिले. त्यांच्या अंगावर शहारे आले. मुक्या प्राण्यांची हिंसा बंद करायची हे त्यांनी निश्चयपूर्वक ठरविले आणि या साऱ्या दंभढोंगावर कीर्तनातून प्रहार केले.

तीर्थयात्रेच्या ठिकाणी बाबा जात तर तेथेही भ्रष्टाचार माजलेला दिसून येई. महाराष्ट्राचे आद्यदैवत म्हणजे पंढरीचा विठोबा. आषाढी कार्तिकीला लाखो लोक दर्शनासाठी येत पण तेथे बडव्यांचे प्रस्थ फार. जे लोक बडव्यांना भरपूर दक्षिणा देत त्यांना दर्शन मिळे व गोरगरिबांना ताटकळत थांबावे लागे. अस्पृश्यांना तर मंदिरात येण्याची बंदीच. ते बिचारे पायरीलाच हात जोडून समाधान मानीत. चोखोबालाही याच बडव्यांनी कधी पांडुरंगाचे दर्शन घेऊ दिले नव्हते. याच बडव्यांनी बाबांनाही मंदिरात येऊ दिले नाही. पण बाबा मवाळ चोखोबा नव्हते. ते दरवर्षी पंढरीला जात,

चंद्रभागेचे वाळवंट स्वच्छ करीत. कीर्तन करीत. पण जन्मभर पांडुरंगाच्या देवळात गेले नाहीत. त्यांचा देव जनताजनार्दनात सामावलेला होता.

### घरच्या लोकांशी भेट

बाबांनी घर सोडून वर्ष झाले होते. इकडे बाबांच्या पत्नी कुंताबाई प्रसूत होऊन मुलगा झाला होता. चांगला धष्टपुष्ट, बाबांसारखाच. त्या दुःखातही सर्वांना आनंद झाला. मुलाचे नाव ठेवले गोविंद.

होता होता ऋणमोचनची यात्रा आली. ऋणमोचनच्या मुद्‌गलेश्वरावर त्यांची भक्ती होती. त्यामुळे बाबा तिथे नक्की येणार असा विश्वास घरच्यांना वाटू लागला. पौष महिन्याच्या पहिल्या रविवारी सारी मंडळी गाडी जोडून ऋणमोचनास गेली. तिथे गेल्याबरोबर कळले की डेबूजी आले आहेत. मुद्‌गलेश्वराचे दर्शन घेऊन शोधायला बाहेर पडले. पण बाबा कुठे दिसेनात. खूप शोधाशोध केल्यावर पूर्णेच्या काठावर एक माणूस कोरडी माती टाकताना दिसला. ते बाबाच होते.

ऋणमोचनला पूर्णा जराशी खोलातून वाहते. दोन्ही काठांवर उंच दरड. पूर्णेत आंघोळ करून ओलेत्याने मुद्‌गलेश्वराचे दर्शन घ्यावे असा रिवाज. लोक ओल्या वस्त्रानिशी दरड चढून येत असल्यामुळे तिथे चिखल तयार झाला होता. वऱ्हाडातील जमीन काळी असल्यामुळे घसरण तयार झाली होती. कित्येक माणसे, बायाबापड्या दरड चढत असताना घसरून पडत. न पडलेले लोक पडलेल्यांना हसत आणि पडलेले खजील होऊन जात. दरवर्षी असे होत असे. पण आतापर्यंत कुणाच्या डोक्यात काही आले नाही. बाबांनी कुणाकडून तरी कुदळी, फावडे, घमेले मागून आणले आणि दरड खोदून कोरडी माती ओल्या मातीवर टाकू लागले. कुणाशी काही बोलत नव्हते. फक्त आपले काम मन लावून करीत होते. सखूबाईंनी आपल्या मुलाला ओळखले. हळूहळू सारे कुटुंब, सगेसोयरे बाबांच्या भोवती जमा झाले. ते सगळे मिळून बाबांना विनंती करीत होते. पण बाबा कुणाचे काही न ऐकता निष्ठेने आपल्या कामात गर्क होते. बाबा काहीच ऐकत नाही हे पाहून कुंताबाईने मुलालाही त्यांना दाखवून बघितले. पण मुलगाही बाबांच्या कामात विघ्न आणू शकला नाही.

आंघोळ करणाऱ्यांची गर्दी ओसरल्यावर बाबांनी कुदळी-फावडे परत केले आणि यात्रेकरूंकडून अर्धी अर्धी भाकरी मागून नदीतीरावर खात बसले. पुन्हा घरच्यांचा सगळा घोळका बाबांभोवती जमला. भाकरी खाणे झाल्यावर बाबा निघाले तेव्हा सखूबाई तळमळून म्हणाली, "अरे तू निगाला बाबू? मंग आमाले कोन रे?"

आता बाबा बोलले. ते म्हणाले, "तुमाले देव आहे."

अचंब्याने सखूबाई म्हणाली, "देव? तू नाहीस काय?"



124330

"मी? आज आहो, उद्या नसन्. इतले मान्स गेले. नवरा गेला. भाऊ गेला. बाप गेला. आई गेली. माझीही तीच वाट!"

रडत सखूबाई बोलली, "असं काहून बोलतं रे बाबू?"

"खरं थेच बोलतो! अवघ्या हिलेच त्या वाटेनं जानं आहे. तू काय देवाकडून अमरपट्टा घेऊन आली काय?"

"मंग आम्ही कोनाकडे जावाव्? कोनाच्या तोंडाकडे पाहाव्?"

"हे पाहा माय, काहीतरी वाट निंगतेच. माहाबा गेला, त्याही वखती निघाली होती. आताही थे निंगते."

"का बा? तू असताना?"

क्षणभर थांबून बाबा बोलले,

"येता माध्या वाटीन? या! मी लोकांचं काम करतो. तुमी करा. मी मांगून खातो, तुमी खा!"

"अरे मांगून खाताना तुले काई वाटत नाई?"

"का बा? लोकांच्या घरच्या भाकरीवर जगनं, ह्या तर वङ्ग्याघरचा कायदाच आहे!"

थोडा वेळ थांबून सखूबाई म्हणाली, "तुह्यावानी निसंग होनं आमाले नाई जमत. आमाले घर आहे, दार आहे."

"मंग आपल्या घरी तुम्ही सुखी असा!"

"तू कोठे भेटशीन आता?"

"महिनाभर मी इथेच आहो."

पुढच्या रविवारी पुन्हा साऱ्यांनी घरी चलण्याची विनंती केली, पण बाबांनी कुणाचेच ऐकले नाही. यात्रेत शेकडो बैलगाड्या येत. स्वयंपाक होई. त्यामुळे राख, कचरा, कडबा जिकडे तिकडे पसरलेला असे. यात्रेकरू पूर्णेच्या काठावरच शौचाला बसत. बाबा हाती खराटा घेऊन तो कचरा स्वच्छ करू लागले. झाडणे कसे अगदी स्वच्छ, कुठेही कचऱ्याचा लवलेश नसे. लोकांना सुरुवातीला त्याचे काही वाटत नसे. उलट झाडत झाडत बाबा आले की कुणीतरी त्यांना म्हणत, "अरे झाडणाऱ्या, थोडा थांब. ही एवढी बटाट्याची सालंही झाडून ने." बाबा ती सालं येईपर्यंत थांबत पण निषेधाचा एक शब्दही त्यांच्या तोंडून उमटत नसे.

यात्रा आटोपली आणि पुन्हा बाबांची भ्रमंती सुरू झाली. पायी, रेल्वेने जसा जमेल तसा प्रवास करीत. बसमध्ये भाड्याला पैसे पडत आणि जवळ तर पैसे नसायचे. रेल्वेत मात्र पैशावाचून अडत नसे. बाबांची रेल्वेत बसण्याची जागा अगदी ठरून गेली होती. संडासाच्या दाराजवळ ते उकिडवे बसत. पुष्कळदा तिकीटचेकरच्या हाती

लागत. तो बाबांना तिकीट विचारी. अंगाची झडती घेई पण पैसा नसेच. एखादा सहृदय असला तर चापटी मारून, नाही तर उठाबशा काढायला लावून सोडून देई. एखादा हेकेखोर असेल तर गाडीतून उतरवून देई. ते स्टेशन आणि ती गाडी बाबांसाठी शेवटची नसायची. बाबा उतरून सरळ पुढील स्टेशनापर्यंत पायी जात अणि तिथून दुसरी गाडी पकडीत. तर कधी स्टेशनच्या बाहेर निघून भीक मागू लागत. एखाद्या बंगल्याचा मालक चिडे. म्हणे, 'काम करता येत नाही? फुकटचे खायला पाहिजे?' मग बाबा त्याची बाग खुरपून देत. तो भाकरी देई ती घेत. पैसे दिले तर मात्र परत करत. घरमालक आश्चर्याने थक्क होई. असा कसा हा भिकारी ज्याला पैशाचा लोभ नाही. रस्त्याने चालताना एखादी म्हातारी लाकडाचे ओझे घेऊन चाललेली दिसली की बाबांना तिची दया येई. तिचे ओझे डोक्यावर घेऊन बाबा सुखरूप तिच्या घरापर्यंत पोहोचवून देत.

## सार्वजनिक पंगत व ऋणमोचनाचा घाट

दुसऱ्या वर्षी बाबा पुन्हा ऋणमोचनाला पोहोचले आणि आपले माती खोदण्याचे काम सुरू केले. आता लोकांनाही बाबांच्या कामाविषयी आपुलकी वाटायला लागली होती. त्यामुळे या वर्षी अनेक लोक त्यांच्यासोबत काम करू लागले. दरड खोदणाऱ्यांची व झाडणाऱ्यांची एक फौजच तयार झाली. ही बहुतेक बाबांच्या नात्यागोत्यातील मंडळी होती. एक दिवस त्यांनी सार्वजनिक भोजनाची कल्पना बाबांना सांगितली. आपण एवढे लोक यात्रेला येतो, प्रत्येकाचा वेगळा स्वयंपाक करतो, त्यापेक्षा सर्वांचा मिळून एकच स्वयंपाक का करू नये? ही कल्पना बाबांनी उचलून धरली. सर्व मंडळी मोठ्या उत्साहाने कामाला लागली. बाबांनी सगळी व्यवस्था अगदी आखून दिली. पैसे एकाकडे, बाजारहाट दुसऱ्याकडे, स्वयंपाक तिसऱ्याकडे. कुणीही कुणाच्या मध्यात पडू नये. अशी कडक शिस्त. दर रविवारी तिथे स्वयंपाक होई. हजार हजार माणसांच्या पंगती बसत. बाबा सारे मैदान स्वच्छ करून घेत. चुन्याने ओळी आखल्या जात; त्यावरच पंगत बसे. जेवण झाल्यावर बाबा स्वत: पत्रावळी गोळा करीत. रात्री कीर्तन सुरू होई. सारे काम शिस्तबद्ध. हजारो लोकांची ही एकी पाहून सगळी यात्रा थक्क होऊन जाई. असा प्रसंग त्यांनी बघितलाच नव्हता. अशा तऱ्हेने सार्वजनिक पंगतीचा पाया ऋणमोचनला घातला गेला. पण स्वत: बाबा कधीही या पंगतीत जेवले नाहीत. ते भिक्षा मागूनच जेवत. पुढील आयुष्यात बाबांनी हजारोंच्या नव्हे तर लाखो लोकांच्या पंगती उठवल्या. भाजी-भाकरीच्याच नव्हे तर पुरणपोळीच्या, पण स्वत: कधी त्या गोडाधोडाला स्पर्श केला नाही. सार्वजनिक अन्न किंवा पैसा आपल्या वैयक्तिक जीवनासाठी वापरायचा नाही

हे त्यांनी पक्के ठरविले होते.

ऋणमोचनला यात्रेत बाबांचे सेवाकार्य सुरूच होते. दरवर्षी बाबा दरड खोदून पायऱ्या तयार करीत पण दरवर्षी त्या पूर्णेच्या पुरात वाहून जात. एक दिवस आठदहा लोकांचा घोळका बाबांजवळ येऊन उभा राहिला. त्यांना नमस्कार करू लागला. बाबांनी त्यांना दूर होण्यास सांगितले तसा घोळक्यातून एक गृहस्थ पुढे आला आणि हात जोडून म्हणाला, "ओळखलं नाही काय महाराज?" बाबांनी चमकून त्यांच्याकडे पाहिले.

"अरे तिडके सावकार होयेत काय?"

"होय महाराज, मी तिडकेच."

"बोला, काय हुकूम आहे?"

"हुकूम कशाचा महाराज, हुकूम तुमी द्यायचा."

"बोला, काय काम काहाडलं?"

"बाबा, हे दरवर्षी दरडी खोदनं किती वर्षं चालणार?"

"काय करावं? पूर्णामाय दरवर्षी वाहून नेते."

"मग पक्का घाट का बांधत नाही?

"इतले पैसे कोन देनार?"

"मी देतो."

ज्या तिडके सावकारांनी बाबांशी भांडण केले होते, बेईमानी केली होती, त्याच तिडके सावकारांनी बाबांच्या मार्गदर्शनाखाली पूर्णेला दगडाचा पक्का घाट बांधून दिला. बाबांनी पुढे अनेक सार्वजनिक बांधकामे केली त्याचा पायासुद्धा हा इथेच अशा प्रकारे घातला गेला.

## पंढरपूरची धर्मशाळा

बाबांची प्रसिद्धी आता वाढू लागली होती. कीर्तनाला तुफान गर्दी होई. बाबांच्या परखड, निर्भीड उपदेशाचा परिणाम साऱ्या महाराष्ट्रावर होऊ लागला. हजारो लोकांनी दारू सोडली, हजारोंनी मांसाहार थांबविला. घरची पशुहत्या बंद केली, सन्मार्ग धरला. यातून वाचलेला पैसा बाबांना देण्याची बुद्धी काही लोकांना झाली.

बाबांना भेटणाऱ्यांत कित्येक पुरुष होते, स्त्रिया होत्या, म्हातारे होते तसेच वृद्ध स्त्रियासुद्धा होत्या. बाबा त्यांची थट्टा करीत. त्यांना म्हणत, "कुकून आल्या?"

त्या गाव सांगत.

"तुपाचं गाडगं संगं आन्ल का नाही?"

"नाही बाबा!"

"झालं मंग! सूनबाई करते त्याचा सत्यानास!"

"नाही बाबा, सून चांगली आहे."

"मंग तुमी तिले सासुरवास करीत असान्!"

"नाही बाबा!"

"नाही त काय? हे करू नको, ते करू नको! इकडं जाऊ नको, नवऱ्याशी बोलूं नको!"

"नाही बाबा!"

"मंग आता काय हुकूम आहे?"

"हे पैसे आहेत आनलेले बाबा!"

"किती आहेत?"

"हजार रुपये. माझ्या धन्यानं माझ्यासाठी ठेवले होते."

"आन् लेकाले सुनेले ठेवाल का नाही?"

"त्यांचे त्यांनाही भरपूर ठेवले आहेत."

"मंग मी याचं काय करू?"

"काहीही करा!"

अशा तऱ्हेने लाखो रुपये लोक गाडगेबाबांना द्यायला तयार होते. पण बाबांनी कुणाचे पैसे घेतले नाहीत. सध्या तुमच्याकडे राहू द्या. आमची ठेव म्हणून राहू द्या. निरोप आला की धाडून द्या. असे सर्वांना सांगितले.

बाबा पंढरपूरला आले. यात्रेच्या दिवसात गावात दोन-तीन लाख लोकांची गर्दी होई. उतरायला जागा अपुरी पडे. बडव्यांच्या जुनाट घरात यात्रेकरू जागा सापडेल तिथे पसरत. जिन्याखाली वाटेल तिथे राहत. पंढरपुरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरलेले असे. सवर्णांची, कशीतरी सोय होई पण अस्पृश्यांचे भयंकर हाल व्हायचे. ते कष्ट बाबांनी स्वत: भोगले होते, यातना अनुभवल्या होत्या. हे दलित वारकरी पंढरीच्या यात्रेला येणारच. त्यांना येऊ नका हे सांगण्यात फायदा नव्हता; कारण पिढ्यान्‌पिढ्या ती भक्ती त्यांच्या रक्तात मुरली होती. त्यांच्यासाठी काहीतरी केले पाहिजे असे बाबांना वाटायला लागले. पंढरपुरात गोपाळपूर रस्त्यावर एक जागा बाबांनी खरेदी केली. गावोगाव निरोप पाठवून पैसे बोलावले. बांधकाम सुरू करायला व्यवस्थापकाची गरज होती. पण तो तेवढाच निर्भय, निरीच्छ व त्यागी असायला हवा. रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर येथील गणपतराव गांगण हे गृहस्थ योगायोगाने पंढरपूरला आले. त्यांची व बाबांची भेट झाली. बाबांच्या कार्याने ते फार प्रभावित झाले होते. बाबांच्या कार्यात वाहून घ्यायची त्यांनी इच्छा प्रदर्शित केली. बाबांनी त्यांच्या स्वच्छ कपड्याकडे पाहून प्रश्न केला की, तुमचे आमचे कसे जमेल? त्याच

क्षणी गणपतरावांनी सदरा, कोट, टोपी ही वस्त्रे काढून टाकली. एक धोतर आणि अंगावर पंचा या वेशात ते जन्मभर बाबांसोबत राहिले. कोणताही माणूस जवळ करताना बाबा त्याची कठोर परीक्षा घेत. तिकिटाविना रेल्वेत प्रवास करायला लावीत, भीक मागायला लावीत; गाडगेबाबांचे नाव न सांगता सार्वजनिक कामासाठी पैसा गोळा करायला सांगत. महारोग्यांची सेवा करायला सांगत. जो प्रामाणिक कार्यकर्ता असेल तोच टिके. बाकीचे पळून जात. गणपतराव गांगण असे प्रामाणिक कार्यकर्ते होते. पंढरपूर धर्मशाळेची सारी जबाबदारी बाबांनी त्यांच्यावर सोपवली.

बाबा अशिक्षित जरी असले तरी सर्व विषयाचे व्यावहारिक ज्ञान त्यांना उपजतच होते. पाया कसा खोदायचा, तो भरायचा कसा, चुना कसा तयार करायचा, बांधकाम कसे असावे, लाकूड कोणते योग्य असे सारे ज्ञान बाबांना होते. इतके की एखादा इंजिनिअरही थक्क व्हावा. पंढरपुरात बाबा स्वत: कामाला लागले. मजूर तर ठेवले नव्हतेच. बाबांचे कार्यकर्तेच सारी कामे करीत.

पंढरपूरची धर्मशाळा बांधत असतानाचा एक प्रसंग. स्वत: बाबा उभे राहून कामे करवून घेत होते. तेवढ्यात एक सौम्य मुद्रेचा, भगवी कफनी घातलेला, पायी कापडी जोडे ल्यालेला संन्यासी येऊन उभा राहिला. पंढरपूरला आल्यावर त्यांच्या कानी आले होते की इथे कोणी महारांसाठी धर्मशाळा बांधीत आहे. त्यांना मोठे नवल वाटले. बांधकामाजवळ येऊन त्यांनी चौकशी केली तेव्हा कामावरील माणसांनी 'ही धर्मशाळा गाडगेबाबा बांधीत आहेत' असे सांगितले.

"कौन गाडगेबाबा? कहाँ है वो!"

कुणीतरी बाबांना निरोप दिला. बाबा आले आणि हात जोडून म्हणाले, "कहिये क्या हुक्म है?"

संन्याशाने आश्चर्याने बाबांकडे पाहिले. त्यांचा विचित्र वेश निरखीत तो म्हणाला, "क्या धर्मशाला आप बनवा रहें है?"


"मैं तो उसका दास हूँ." बाबांचे उत्तर.

"लेकीन अस्पृश्यों के लिये?"

मग बाबांनी अस्पृश्य वारकऱ्यांना काय यातना सोसाव्या लागतात याची कर्मकहाणी सांगितली. कामावर हिंडवून सर्व माहिती करून दिली. ते स्वामी होते गुजरातेतील. स्वामी अखंडानंद. स्वामीजी सर्व ऐकत होते, प्रभावित होत होते. ते बाबांना म्हणाले, "इच्छा होती है, मैं भी कुछ हाथ बटाऊं."

बाबांना वाटले की, शेदोनशे रुपये देतील. स्वामिजींनी चेकबुक काढले आणि चेक फाडला, पंचवीस हजाराचा!

असा सर्व बाजूंनी पैसा बरसू लागला. पंढरपूरची 'चोखामेळा धर्मशाळा' ही




संत गाडगेबाबा




कर्मवीर भाऊराव पाटील, गाडगेबाबा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर




माई आंबेडकर, डॉ. आंबेडकर व गाडगेबाबा



गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज



गाडगेबाबा व डॉ. पंजाबराव देशमुख



विद्यालयाचे मैदान विद्यार्थ्यांसोबत साफ करताना



प्र. के. अत्रे व गाडगेबाबा



वृद्ध भिकाऱ्यांना सदावर्तात आणताना (नाशिक)



स्वच्छता करताना



नाशिक नगरपालिकेत कीर्तन करताना



उपराई येथील हिंसाबंदीनिमित्य काढलेली मिरवणूक



गौरक्षण संस्था नागरवाडी



आश्रमशाळा नागरवाडी



अस्पृश्यांसाठी महाराष्ट्रातील पहिली धर्मशाळा उभी राहिली. याच पंढरपुरात पुढे बाबांनी आणखी दोन धर्मशाळा बांधल्या. त्यानंतर गाडगेबाबांनी नाशिक, देहू, आळंदी, त्र्यंबकेश्वर, पुणे, मुंबई, ऋणमोचन, मूर्तिजापूर इत्यादी ठिकाणी वर्गण्या जमवून धर्मशाळा बांधल्या. पुण्याची 'श्री गाडगेमहाराज आकूल धर्मशाळा' बांधायला तर १९४० साली दीड लाख रुपये खर्च आला. तो सर्व बाबांच्या विचारसरणीने प्रभावित झालेल्या लोकांनी केला. यावरून बाबांची लोकप्रियता लक्षात येते.

ज्या क़ामासाठी बाबांनी रक्कम उभी केली असेल त्याच कामासाठी ती खर्च केली जाई. दुसऱ्या कामी ती खर्च झालेली बाबांना खपत नसे. एकदा तनपुरे महाराजांनी ठरलेल्या कामाची रक्कम दुसऱ्या कामी खर्च केली, तेव्हा बाबा संतापले आणि त्यांनी तनपुरे महाराजांसारख्या मोठ्या व्यक्तीला कामावरून दूर केले.

धर्मशाळेच्या इमारतीचे काम करीत असताना सोबतच्या लोकांच्या भोजनाची उत्तम व्यवस्था बाबा ठेवत. दररोज तीन वेळा जेवण मिळे. भाजीत भरपूर तेल टाकायला सांगत, त्यामुळे माणसाची कार्यशक्ती टिकून राहत असे. त्या जेवणाची आठवण होताच आजही कित्येकांच्या डोळ्यांत पाणी येते. बाबा काम करणाऱ्यांच्या पाठीवरून आईच्या ममतेने हात फिरवीत. कुणी आजारी पडले तर रात्र रात्र जागून त्याची सेवा करीत. त्यांना कामाचा माणूस आवडत असे; ऐतखाऊंचा प्रचंड तिटकारा करीत.

## गोरक्षणाची मोहीम

गाई-बैल म्हातारे झाले की त्यांना कसायाला विकण्याची प्रथा त्या काळी सर्रास होती. बाबांना त्या मुक्या प्राण्यांबद्दल फार सहानुभूती वाटे. बैलाला टोचलेल्या पराणीने ज्यांना वेदना व्हायच्या त्या बाबांनी कसाईखान्याकडे पाय ओढत चाललेल्या गलितगात्र गुरांचा तांडा पाहिला की, त्यांना भडभडून येई. ते आपल्या कीर्तनातून सांगत,

गायीसारखे दुसरे उपयोगी जनावर नाही.

गाय दूध देते. शेतीसाठी बैल देते. शेतासाठी खत गायी-बैलाच्या शेणापासूनच होते.

उद्या गायीने गोऱ्हे दिले नाहीत तर शेती कशाने कराल? स्वतः जुंपून घ्याल काय?

गाय दूध देते तोपर्यंत आपण तिला खायला-प्यायला घालतो आणि म्हातारी झाली की कसायाहाती विकून टाकतो!

जे काय चार-दोन रुपये येतात त्याचा मुलांना खाऊ घेऊन परततो.

आता तुमच्या या बुद्धीचे किती कौतुक करावे?
अरे, आईबाप म्हातारे होतात, त्यांनाही बाजारात उभे करावे!
तुकोबाराय म्हणतात :

*धिक् तो दुर्जन नाही भूतदया ।*
*व्यर्थ माय तया प्रसवली ।।*

अशा चांडाळाला जन्म देण्यापेक्षा आईच्या पोटी धोंडा का आला नाही?

अरे, एवढे कठीण कसे रे तुमचे मन! त्या गायी-बैलांना उपाशीपोटी बाजारात उभे करता. कडबा नाही! प्यायला पाणी नाही!

ते गायी-बैल तुम्हाला काय आशीर्वाद देत असतील? गायी-बैल म्हातारे झाल्यावर त्यांना बाजारात उभे करणाऱ्याचे कधी बरे होणार नाही!

अशा पद्धतीने बाबा अगदी तळमळून बोलत. ते शेतकऱ्याच्या जिव्हारी लागे. एक दिवस असेच कीर्तन झाल्यावर काही शेतकरी बाबांकडे आले. आणि खाली मान घालून उभे राहिले. बाबांनी विचारल्यावर त्यांनी सांगितले, की आम्ही अतिशय दरिद्री आहो, म्हातारी जनावरे पोसणे शक्य नाही. पण आता ती आम्ही कसायाला विकणार नाही, वाटल्यास तशीच सोडून देऊ.

हा प्रश्न बरेच दिवसापासून बाबांच्या मनात घोळत होता. अशा जनावरांची काही व्यवस्था केली पाहिजे. अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर (रेल्वे) हे गाव म्हणजे बाबांची कर्मभूमी. पण याच गावी मोठा बाजार भरून हजारो गुरे कसायाच्या हाती विकली जात.

एक दिवस मूर्तिजापूरचे नानासाहेब जमादार नामक धनिक गृहस्थ बाबांना भेटायला आले. बाबांसाठी काहीतरी करावे असे फार दिवसापासून त्यांच्या मनात होते. मूर्तिजापूर स्टेशनला लागूनच त्यांचे एक मोक्याचे शेत होते. या शेतात अनाथ गुरांसाठी संस्था काढावी असे बाबांच्या मनात आले. जमादारांशी बोलल्यावर त्यांनी तात्काळ छप्पन एकर शेत गोरक्षण संस्थेसाठी दिले. परंतु पाण्यासाठी विहीर आवश्यक होती. संपूर्ण तिडके घराण्याची बाबांवर फार भक्ती जडली होती. विहीर खणायची गरज आहे, हे कळताच तुकारामजी तिडके यांनी विहिरीचा खर्च देण्याचे कबूल केले. पुन्हा नेहमीसारखाच मदतीचा पाऊस पडला आणि मूर्तिजापूरचे गोरक्षण उभे राहिले.

यानंतर गावोगाव अशा गोरक्षण संस्था बाबांच्या प्रेरणेने उभ्या राहिल्या.

## शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे

आजपर्यंत भारतातील कोणताही संत शाळेतील शिक्षणाविषयी बोलला नव्हता. संत म्हणजे केवळ अध्यात्माचे, स्वर्गाचे, मृत्यूचे तत्त्वज्ञान सांगणारे अथवा

वेडेवाकडे चमत्कार करणारे असेच समीकरण होते. उपवास कर, आषाढी-कार्तिकीला पंढरीला जा, देहू-आळंदी कर अशी आजपर्यंतच्या संतांची रूढी. लोक गाडगेबाबांना संत म्हणत पण ते खऱ्या अर्थाने लोकशिक्षक होते. गाडगेबाबांनी लोकांना शिक्षण घेण्याचा उपदेश केला. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रेरित केले. बाबा नेहमी म्हणायचे, 'शिक्षणावाचून माणूस आंधळा असतो; शिक्षणाविना माणूस म्हणजे निव्वळ धोंडा.' निरक्षरतेचे फळ त्यांनी स्वत: भोगले होते. मामा निरक्षर असल्यामुळेच सावकार त्यांची जमीन बळकावू शकला हे त्यांना समजले होते. पण याहीपेक्षा भयानक अनुभव त्यांना भ्रमण करीत असताना आले. बाबा आपला एक अनुभव नेहमी सांगत : भटकंतीच्या काळात एकदा एका खेड्यात भिक्षा मागत होतो. ज्या घरी भिक्षा मागायला गेलो तेथे एक महार हातात पत्र घेऊन आला आणि घरमालकाला पत्र वाचून दाखविण्यासाठी विनवू लागला. त्या शिकलेल्या घरमालकाने 'तुझे पत्र वाचून देतो पण अंगणातील ही लाकडे फोडून दे' अशी अट घातली. महार कुऱ्हाड घेऊन लाकडे फोडू लागला. बरीच लाकडं फोडली. फोडता फोडता बिचाऱ्याच्या हाताला फोड आले. तो म्हातारा माणूस थकून गेला. थोडा वेळ थांबून ते पत्र वाचून दाखविण्याची विनंती करू लागला. परंतु तो सुशिक्षित माणूस 'ती सारे लाकडे फोड मगच तुला पत्र वाचून दाखवतो' असे म्हणून अडून बसला. पत्र वाचूनही दाखविना आणि परतही करीना. त्याचे ते बोलणे ऐकून मी हाती कुऱ्हाड घेतली आणि उरलेली लाकडे फोडून दिली. मग त्या सुशिक्षित माणसाला म्हणालो, 'आता तरी पत्र वाचून दाखवा, नाही तर परत करा.' त्या निर्लज्ज गृहस्थाने ते पत्र वाचून न दाखवताच परत केले.

ही घटना बाबांच्या जीवनावर फार मोठा परिणाम करून गेली. म्हणूनच बाबा लोकांना एकवेळ उपाशी राहा, चार कपडे कमी घाला, चार सण कमी करा, पण मुलांना शिकविल्याशिवाय राहू नका असे परोपरीने सांगायचे. विदर्भातील शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या 'श्री शिवाजी संस्थे'ने चालविलेल्या शाळांमध्ये बाबा कितीदा तरी गेले. सातारच्या कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेत जाऊन तेथील वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या अंगावरून कितीदा तरी प्रेमाचा हात फिरविला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीला मदत केली. गाडगेमहाराजांनी कधी पोकळ सल्ला दिला नाही अथवा कोरडा उपदेश केला नाही. ते जे सांगत तेच कृतीत उतरवीत. एकदा मूर्तिजापूरला आले असताना त्यांना कळले की नानासाहेब तिडके यांनी सुरू केलेली शाळा बंद पडली. त्यांनी नानासाहेबांना बोलावून अडचण विचारली. नानासाहेबांनी जागेची अडचण सांगताच बाबा म्हणाले, 'मी देतो जागा लागेल तेवढी,' आणि ताबडतोब

गोरक्षणाच्या खोल्या शाळेसाठी दिल्या. बाबांची ही शिक्षणाविषयीची तळमळ पाहून नानासाहेब भारावून गेले. आज मूर्तिजापूरला 'श्री गाडगेमहाराज महाविद्यालय' आणि 'गाडगेबाबा विद्यालय' या दोन संस्था ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत आहेत. या दोन्ही ठिकाणी गाडगेबाबांचे सुंदर पुतळे नानासाहेबांनी बसविले आहेत.

अर्धवट शिक्षण सोडून दिलेला कोणी मुलगा बाबांना भेटला की ते स्वत: त्याला वसतिगृहात घेऊन जात. अशा शिकणाऱ्या मुलांसाठी बाबा आपल्या माणसाकरवी वह्या, पुस्तके, कपडे पाठवीत. हुशार विद्यार्थ्यांचे बाबांना मोठे कौतुक. वर्गामध्ये पहिल्या आलेल्या मुलाला ते आनंदाने कवटाळीत आणि कीर्तनामधून त्याचे जाहीर कौतुक करीत.

शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे, या डोळ्याने माणसाला नवी दृष्टी येते, असे बाबांना वाटायचे. त्यामुळे बाबा व त्यांच्या 'गाडगेबाबा मिशन'ने शिक्षणक्षेत्रात फार मोलाचे कार्य केले. भटक्या आणि मागासलेल्या जमातीच्या मुलांना शिक्षण देण्यासाठी महाराष्ट्रभर बावन्न शाळा व वसतिगृहे काढली होती. त्या सर्व शाळा आजही ज्ञानदानाचे काम करतात.

## पशुहत्या बंदी

मुक्या प्राण्यांबद्दल बाबांच्या मनात अपार सहानुभूती. आपल्या बारा वर्षांच्या भ्रमण काळात ते अनेक यात्रांतून फिरले होते. महाराष्ट्रातील सर्व यात्रांत मिळून हजारोच नव्हे तर लाखो कोंबड्या-बकऱ्यांचे बळी दरवर्षी जात असल्याचे त्यांनी पाहिले होते. त्याचे बाबांना अत्यंत वाईट वाटे. बाबांनी या पशुहत्येविरुद्ध प्रचाराचा धडाका सुरू केला. जेथे जेथे पशू बळी दिले जात तेथे बाबा स्वत: धाऊन जात. कीर्तनातून लोकांना परोपरीने समजावून सांगत आणि हत्या बंद करण्याबद्दल विनवीत. अनेक यात्रांमध्ये तर ही हिंसा बंद करण्यासाठी बाबांनी स्वत:चे प्राण पणाला लावले होते. ज्या गड्ड्यामध्ये पशू बळी दिले जात, त्यात बाबा स्वत: जाऊन बसत आणि म्हणत, 'बोकडाच्या मानेवर सुरी चालविण्यापूर्वी माझ्या मानेवर सुरी चालवा.' पुष्कळदा लोक ऐकत. पण कधी कधी भांडणे होत. १९३३ साली वरवंडी या गावी मरीआईपुढे होणारी हत्या बंद करण्यासाठी बाबा आले असता हनुमंत्या नावाचा भिल्ल हातात कुऱ्हाड घेऊन बाबांना मारायला धावला होता. तरीही बाबा निश्चल होते, निर्भय होते.

पशुहत्येप्रमाणे शंकरपट भरविण्यासही बाबांचा विरोध होता. महाराष्ट्रामध्ये त्या काळी शंकरपटाचे फार वेड. जिथे शंकरपट भरत तेथे बाबा कीर्तनाला जात नसत. ते म्हणत, 'अरे मलाही बोलावता व शंकरपटही ठेवता? जेथे शंकरपट तेथे मी जात नसतो.' बाबा कीर्तनातून लोकांना कळवळून सांगत, 'बाप हो! ज्या बैलांकडून काम

करून घेता त्याच बैलांना आरूने टोचून रक्तबंबाळ करता? पटात बैलानी खूप धावावे म्हणून टोचून टोचून हाकलता! त्यापेक्षा माणसाचा पट का भरवत नाही? माणसांचा पट भरवावा व त्याला आरूने कोंबे द्यावे. असा का नाही शंकरपट भरवीत?'

बाबांनी आपल्या भ्रमंतीमध्ये जगाचे खूप निरीक्षण केले होते. विविध अनुभव घेतले होते. त्यांचे सगळे ज्ञान व तत्त्वज्ञान या अनुभवातून आले होते. म्हणूनच हजारो वर्षांपासून चालत आलेल्या रूढी, परंपरा यांना धक्का देण्याचेच नव्हे तर समूळ नष्ट करण्याचे सामर्थ्य त्यांच्या वाणीत होते. हजारो वर्षे वेदमंत्र घोकणाऱ्यांना जे दिसले नाही, जे कळले नाही, ते गाडगेबाबांना दिसले, कळले. ही पशुहत्या बंदीची मोहीम जीवनाच्या अखेपर्यंत बाबांनी चालविली.

## नातेवाईकांचा हक्क अमान्य

गाडगेबाबांनी मोठमोठ्या धर्मशाळा बांधल्या, वसतिगृहे उघडली, गोरक्षणे स्थापन केली परंतु त्या संस्थांत आपला किंवा आपल्या नातेवाईकांचा कोणताच हक्क ठेवला नाही. आपल्या पत्नीला व मुलींना कोणत्याही धर्मशाळेत राहण्यास जागा देऊ नये असा स्पष्ट आदेशच त्यांनी प्रत्येक धर्मशाळेच्या चालकाला दिला होता. बाबांनी आपल्या मुलींचेसुद्धा कधी लाड केले नाहीत. त्यांच्या जावयांनाही कधी काम केल्याशिवाय जेवण मिळत नसे. बाबांच्या या नि:संग वृत्तीमुळे घरच्यांना फार त्रास होई. बाबा त्यांना कोणत्याही ठिकाणी झोपडी बांधून ठेवत. त्या ठिकाणी धर्मशाळा असली तरी तेथे राहाण्याची परवानगी मिळत नसे. मायलेकींना मजुरी करून पोट भरण्यास सांगून बाबा बाहेरगावी निघून जात. इकडे गाडगेबाबांच्या पत्नी व मुली म्हणून लोक त्यांना भांडीकुंडी, कपडे, धान्य इत्यादी आणून देत. महिन्या दोन महिन्यांनी बाबांची फेरी झाली आणि त्यांना घरात एवढ्या वस्तू दिसल्या की ते मोठ्याने हसत बाहेर पडत व आंधळे, लंगडे, महारोगी, भिकारी यांना बोलावून आणून घरातील त्या साऱ्या वस्तू वाटून टाकीत. पत्नी कुंताबाई आदळआपट करी, रडे पण बाबांवर त्याचा काहीच परिणाम होत नसे. आपल्या मृत्युपत्रातही 'आपल्या कोणत्याच नातेवाईकाचा गाडगेबाबा मिशनच्या संपत्तीवर हक्क असणार नाही,' असे त्यांनी स्पष्ट लिहून ठेवले होते.

## थोर नेत्यांसोबत बाबांची मैत्री

गाडगेबाबा आणि महात्मा गांधी यांची दोनदा भेट झाल्याची नोंद आहे. फैजपूर येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात बाबांनी यावे असा आग्रह त्यांना बाळासाहेब खेर यांनी केला. बाबा कीर्तनातून राष्ट्रभक्तीचा प्रचार करत असले तरी प्रत्यक्ष राजकीय

चळवळीत भाग घेत नसत. आपले खरे काम खेड्यात आहे असे ते नेहमी म्हणत. त्यामुळे काँग्रेस अधिवेशनाला येण्यास त्यांनी नकार दिला. पण नामदार खेरांनी फारच आग्रह केल्यामुळे बाबा फैजपूरला गेले. तेथे त्यांची महात्माजींशी ओळख झाली. बाबांनी महात्माजींकडून अधिवेशनाच्या पटांगणात साफसफाई करण्याचे काम मागून घेतले. महात्माजींशी बाबांची दुसरी भेट वर्धा येथील आश्रमात झाली. त्या वेळी महात्माजींनी बाबांना सोबत जेवायला बसण्याचा आग्रह केला. त्यांना विनयाने नकार देऊन बाबा खालीच बसले व हातावर कांदा, भाकर, चटणी मागून खाऊ लागले. रात्री प्रार्थना झाल्यावर महात्माजींनी भाषण देण्याचा आग्रह केला तेव्हा बाबांनी अर्धा तास भाषण केल्याची नोंद आहे. बाबांना आणखी काही दिवस राहण्याचा आग्रह महात्माजींनी केला. पण कीर्तन असल्याने बाबांनी मोठ्या नम्रतेने नकार देऊन त्यांचा निरोप घेतला.

डॉ. पंजाबराव देशमुख आणि बाबा यांचा परिचय अगदी योगायोगाने झाला. १९२७ साली गाडगेबाबा अमरावती येथील कॉटन फंड कमिटीच्या विशाल प्रांगणात शिरून तिथला केरकचरा साफ करीत होते. एवढ्यात त्यांचे लक्ष 'श्रद्धानंद छात्रालय' या पाटीवर गेले. बाबांना वाचता येत नसले तरीही तेथे वावरणाऱ्या मुलांवरून हे बोर्डिंग असले पाहिजे हे त्यांनी ताडले. बाबा आतमध्ये गेले तेव्हा मुलांची जेवणे सुरू झाली होती. ॲल्युमिनियमची ताटं! काही वेडीवाकडी झालेली, काहींना छिद्रे पडलेली अशी होती. त्या छिद्रातून भाजी जमिनीवर सांडत होती. पाणी पिण्यास फुटके प्याले होते. बाबांनी अधीक्षकाकडे चौकशी केल्यानंतर डॉ. भाऊसाहेब देशमुख हे वसतिगृह चालवीत असल्याचे कळले. अधिक चौकशी केल्यानंतर असे कळले, की प्रत्येक मुलाकडून चार आणे महिन्याकाठी घेऊन हे वसतिगृह चालविले जाते, तेवढ्याने खर्च भागत नाही म्हणून भाऊसाहेब गावोगाव फिरून वर्गणी गोळा करत होते. बॅरिस्टर झालेला हा माणूस गरीब मुलांच्या शिक्षणासाठी वणवण भटकतो हे ऐकून बाबांना फार आत्मीयता वाटू लागली. बाबा तिथून निघाले ते सरळ जवळच्या रेवश्याला गेले. तेथे बाबांचे एक भक्त शेठ रामनाथ बियाणी राहत होते. त्यांना बाबांनी या वसतिगृहासाठी पितळेची ताटे, वाट्या, पेले पाठविण्याची विनंती केली. बियाणी शेठनी बाबांची मागणी तर पूर्ण केलीच पण भाऊसाहेब देशमुखांना निरोप पाठवून बोलावून घेतले. भाऊसाहेब आल्यावर बाबांनी चक्क त्यांच्या पायावर डोके ठेवले. एवढे बाबा विनम्र स्वभावाचे होते. येथूनच पंजाबराव देशमुखांचा आणि बाबांचा जो स्नेह जुळला तो अखेरपर्यंत टिकला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि गाडगेबाबा यांचे अतूट नाते होते. बाबासाहेबांनी सुरू केलेल्या दलितांच्या मुक्ती संग्रामाला बाबांचा केवळ पाठिंबाच नव्हता तर

आपल्या कीर्तनामधून ते अस्पृश्यतेविरुद्ध टीकेची झोड उठवून ते या क्रांतीला मदतही करीत होते. मुंबईच्या आजूबाजूला बाबांचे कीर्तन असले की डॉ. आंबेडकर, आचार्य अत्रे यांच्यासारखी मोठी मंडळी अशिक्षित बाबांच्या कीर्तनाला जाऊन बसत. यावरून बाबांच्या वाणीचे सामर्थ्य किती होते हे लक्षात येते. एकदा मुंबईच्या भायखळा मार्केटमध्ये बाबांचे कीर्तन होते. डॉ. आंबेडकर आपल्या एका सहकाऱ्यासोबत कीर्तनाला गेले. बाबांचे कीर्तन सुरू होताच डॉ. आंबेडकरांच्या सहकाऱ्याला काही शंका आल्यामुळे ते उठून उभे राहिले आणि बाबांना म्हणाले, "महाराज, एक शंका विचारू का?"

"इचारा मायबाप. पन मले महाराज म्हनू नोका. मी आपलं लेकरू हाये. बोलविते धनी थे बसलेत तुमच्या पलीकडे."

असे म्हणून गाडगेबाबांनी बोट दाखविले. सारी गर्दी वळून बघू लागली तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखा थोर माणूस चक्क खाली बसून कीर्तन ऐकत होता. असे होते बाबांचे आणि डॉक्टरसाहेबांचे संबंध. आंबेडकरांचे महानिर्वाण झाले तेव्हा बाबा ढसाढसा रडले.

गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे संबंध तर अगदी पितापुत्राप्रमाणेच होते. ज्या वेळी बाबा घराबाहेर पडले त्या वेळी तुकडोजींचा जन्मही झाला नव्हता. तरीही दोघांच्या कार्याची दिशा एकच असल्याने एक सहज संबंध दोघांत स्थापन झाला. एवढा की बाबांच्या निधनानंतर राष्ट्रसंत आल्याशिवाय बाबांच्या शवाला अग्नी दिला गेला नाही. राष्ट्रसंत त्या दिवशी मुंबईत होते. जेव्हा त्यांना ही बातमी कळली तेव्हा त्यांच्या मुखातून शब्द बाहेर पडले :

*सुनी खबर की संत गाडगेबाबा हमको छोड गये ।*
*धडक भरी छाती में, हमको पलभर तो नही होश रहे ।।*

## महानिर्वाण

बाबांचे आता वय होत आले होते. शरीर पूर्वीसारखे साथ देत नव्हते. बाबा मधून मधून आजारी पडायचे. तरीही कामात खंड पडला नव्हता. प्रकृती ढासळत असतानाही देशभर भ्रमण सुरूच होते. आज नागपूर जिल्ह्यातील एखाद्या खेड्यात तर उद्या एकदम पुण्याजवळ. परवा मराठवाड्यात. बाबा रात्रीचे दोन-तीन तासच काय ती झोप घेत. बाकी सर्व वेळ उभे राहायचे. वय जवळपास ऐंशीच्या घरात पोहचले असूनसुद्धा एकाच दिवशी दोन दोन गावी कीर्तन करायचे. तेही थोडेथोडके नव्हे तर तीन तीन तास. शरीर तरी कुठपर्यंत साथ देणार? ते एक दिवस थकणारच. ढासळत जाणाऱ्या प्रकृतीची काळजी घेण्याबद्दल त्यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनीही सुचविले. महाराष्ट्रातील कित्येक डॉक्टर त्यांच्यावर इलाज करण्यासाठी

मागे धावत होते. पण बाबा कुणाचेच ऐकेनात. तशी त्यांना प्रकृतीच्या अस्वस्थतेची, ती खचत चालल्याची चाहूल १९५१ पासूनच लागली होती. पण त्याकडे लक्ष द्यायला त्यांना वेळ होताच कुठे!

१८७६ मधला जन्म. बालपणापासूनच जीवनात सुख कधी लाभलेच नाही. घरात कष्ट. शेतात कष्ट. सावकाराकडून जमीन सोडवून घेण्यासाठी कष्ट. पुढे सार्वजनिक जीवनात प्रवेश केल्यावर ते सतत वाऱ्यासारखे फिरत राहिले. जीवनभर लाखो रुपयांच्या देणग्या गोळा करूनसुद्धा स्वत:साठी, स्वत:च्या औषधपाण्यासाठी, कपड्यालत्त्यासाठी एक पैसादेखील खर्च केला नाही. लाखो लोकांना, आंधळ्या-पांगळ्या भिकाऱ्यांना पुरणपोळीचे जेवण दिले. स्वत: मात्र जन्मभर भाजी-भाकरीशिवाय दुसरे काही खाल्ले नाही. तीही चार घरून मागून आणलेली! शहरे वगळता कधी घरात आसऱ्याला राहिले नाहीत. खेड्यात त्यांचा मुक्काम झाडाखालीच असायचा. अशा अवस्थेत शरीर मजबूत होते म्हणून पंचाऐंशी वर्षे तरी टिकले, अन्यथा केव्हाच कोलमडून पडले असते.

१९५५ साली आषाढी यात्रेला ते पंढरपूरला गेले नाहीत. प्रकृतीच्या कारणामुळे दरवर्षीचा आपला नियम त्यांना मोडावा लागला. इतक्यात मधुमेहाचा विकार बळावू लागल्याने बाबा केवळ तुरीच्या वरणाचे पाणी पीत. कधी खाल्ला तर भाकरीचा अर्धा पोपडा.

श्री. गणपतराव तपासे आणि श्री. मालोजी राजे नाईक-निंबाळकर या बाबांच्या दोन स्नेह्यांनी अतिशय आग्रह करून त्यांना मुंबईच्या सेंट जॉर्ज हॉस्पिटलमध्ये ठेवले. इथेही बाबांना स्वस्थता लाभली नाही. हजारो लोक भेटीसाठी येत. बाबा त्यांच्याशी बोलत. पत्रे लिहिणे, निरनिराळ्या संस्थांचे हिशेब बघणे, त्यांची व्यवस्था लावणे सुरू होते. बाबा आता आपल्या कार्याची आवराआवर करायला लागले होते.

४ जुलै १९५५ च्या मध्यरात्री सगळे गाढ झोपले असताना बाबा एका अनुयायास घेऊन हॉस्पिटलबाहेर पडले. बाहेर येऊन एकेक काम उरकण्याचा सपाटा सुरू केला. बिघडलेल्या तब्बेतीची चिंता न करता चौफेर फिरण्याचा सपाटा सुरू केला. होता होता छप्पन साल उजाडले. यावेळी मात्र आषाढीला बाबा पंढरपूरला गेले. तेथे कीर्तने केली आणि तेथून तडक अमरावती जिल्ह्यातील नागरवाडीच्या गोरक्षणाच्या बांधकामावर हजर राहिले.

हळूहळू बाबांची दृष्टीही मंद होऊ लागली होती. मुंबईला आल्यावर त्यांना चष्मा घेण्याचा आग्रह काही मंडळींनी केला. त्याला पंचवीस रुपये पडतात हे पाहून नकार देत ते म्हणाले, 'पंचवीस रुपयात तर गोरगरिबांचे पूर्ण लग्न होते.'

८ नोव्हेंबर १९५६ रोजी वांद्रे पोलीस स्टेशनमध्ये पोलिसांनी सत्यनारायण केला.

तिथे बाबांनी यावे असा त्यांचा आग्रह होता. 'आमची तब्बेत बरी नसल्यामुळे आम्ही पडून आहोत' असे बाबांनी त्यांना सांगितले. पण पोलीस अधिकाऱ्याने 'बाबा, तुम्ही फक्त तिथे या, कीर्तन करू नका', असा आग्रह केल्यामुळे बाबा तिथे गेले. समोर पसरलेला तो विशाल जनसागर पाहून त्यांना राहवले नाही. त्याही अवस्थेत ते उठले आणि त्यांनी कीर्तन सुरू केले.

'तुकाराम महाराज - सत्पुरुष! जगाले उपदेश करतत - चार वेद केले ब्रह्मदेवानं, पाचव्या वेदाची वानी केली तुकोबारायानं. ते महान पुरुष जगाले उपदेश करतत की मानसाच्या जल्मात आल्यावर आपन काय करावं? पैसा कमवावं्, का बायकापोरं पोसूनच मरावं्, का सग्यासोयऱ्यांचा, गनगोताचा मेळ करून ह्याच्यातच आयुष्य घालवावं्? तरी मानसाच्या जल्मात येऊन जो देवाचं भजन करील - तुकोबाराया म्हनतत्, तो देव होईल देव! तुकोबारायाचा स्वत:चा पुरावा आहे -

*देव पाहावयासी ... गे ऽ लो ऽ ।*
*अन्-तेथे देव होवोनी .... ठेलो ॥*

तुकोबा म्हणत, मी शेतकरी, शेतकऱ्याचा मुलगा, मले ईश्वराच्या भक्तीचं काय ज्ञान? संतांचे पुरावे ऐकून भक्तिमार्गाले लागलो. देव कसा असेल....?

*देव पहावयासी... गे ऽ लो ऽ।*

देव नाही दिसला, तुकोबाराया म्हनत्त, मीच देव झालो. आणखीन एक पुरावा आहे, कोनी देव देव म्हणून मनात कल्पना आनत असतील — देव कसा असील, देव कधी भेटील, देव कधी पाहू? अशा ज्या मानसाच्या मनात कल्पना असतील तो माणूस भर्मिष्ट! पुर्थई पैदा झाली ताहापासून देव कोन पाह्यला नाही, देव कोनाले दिसनार नाही - देव पाह्याची वस्तू नाही. देवळात देव, नदीवर देव, इकडे देव, तिकडे देव, रामेश्वर देव, बद्रीनारायन देव — हा बाजार आहे देवाचा. ज्याले देव म्हनतत, परमेश्वर म्हनतत, की ज्याचे हुकमानं हे सर्व ब्रह्मांड चालंल, तो कोनी पाहिला नाही, अन् तो कोनाले दिसनार नाही, मात्र त्याचं भजन केल्यानं मनुष्य देव होते.

मानूस बायकोशी बोलते, पोरीशी बोलते, मित्राशी बोलते, भांडन करते, शिव्या देते, पन त्याले भजन कऱ्याची लाज वाटते. ज्या मानसाले भजन कऱ्याची लाज वाटली, तो मानूसच नाही!

*गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला ॥*

देव कसा आहे? जसं वारं. ज्ञानेश्वरीत पुरावा आहे.

*वायुवसे सकळ ठा ऽ यी ।*
*परी त्याचे बिऱ्हाडचि ना ऽ ही ॥*

वारं आहे ना वारं? पुर्थईभर वारं आहे. घरात, दारात, झाडात, जिकडे तिकडे वारं

आहे. पण कोनी असं नाही सांगत, की रात्री वाऱ्याचा मुक्काम बंबईच्या ठेसनावर होता. सांगते का कोनी?

— ना ऽ ही!

परवाच्या रोजी वारं साताऱ्याच्या ठेसनावर होतं अस सांगते का कोनी?

— ना ऽ ही!

मग असं वारं आहे, लाल आहे, हिरवं आहे, पिवळं आहे ते समजत नाही अन् त्याच कुठे ठिकान नाही. असा परमेश्वर आहे, अन् हे तीर्थात—देव बसवले ना तीर्थात? जगन्नाथ, रामेश्वर हे पोट भरन्याचे देव आहेत! हे देव नाहीत. देव देव करता लोक तीर्थाले चालले - तुकोबा निघाले.

*देव देव करता शिनले माझे म ऽ न!*

देव देव म्हणून तुकोबा म्हनतत् मी खूप फिरलो. मले शीन आला. पण देव नाही दिसला. मंग दिसलं काय?

*पानी आणि पाषान जेथे ते ऽ थे!*

मग मले दिसलं काय? दगडाचा देव, गंगेचं पानी! पानी! देव नाही दिसला. कबीर पुरावा देतात :

जत्रामे फत्रा बिठाया तीरथ बनाया — पा ऽनी भटजीची एक लयन आहे. तांब्याभर पान्याचे पंध्रा रुपये - दोन आने चमचा - तीर्थ घ्या - दोन आने चमचा! हे भटजीची लयन आहे.

जत्रामे फत्रा बिठा ऽ या!

जत्रेत देव कशाचा आहे बोला?

दगडाचा ऽ!

हां, शाबास. कशाचा आहे?

दगडाचा ऽ!

अन् गंगेच्या पान्याचं तीर्थ — याची जोडी जमली.

*जत्रामे फत्रा बिठाया तीरथ बनाया पा ऽ नी ।*
*दुनिया भई दिवानी पैसेकी धुलधा ऽ नी ।*

तीर्थाले जानं देवाचा संबंध नाही. पैशाचा नाश-खाना खराब आहे.

गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला ।।

तुकोबा म्हनतत् -

*दगडाचा देव बोलील तो कैसा*
*कवन काली वाचा फुटिल - त्या ऽ सी ।।*

जगन्नाथाले गेले, देवानं तुम्हाला बोलावलं का? कुठून आले? किती जन अहा?

जेवले का नाही? चहा पेले का नाही? बोलला होता का देव तीर्थात?

— ना ऽ ही.

मग तीर्थात देव नाही. पैशाचा नास आहे. जे तीर्थाले जातील, त्यांना पैशाचा नास करण्यात तीर्थ आहे, वर हात करून भजन करू.

वर हात केल्याची मानसाले लाज वाटते लाज. एवढासा परसाद, माशीएवढा!

मग बाबा प्रसादासाठी होणाऱ्या धडपडीचा अभिनय करून दाखवतात.

अन् भजन कऱ्याले हात वर करा म्हटलं तर त्या हाताला जसा मोठा शीन आला. सुंदर हात करून भजन करू

*गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला ॥*

वर हात केल्यानं देवाची भक्ती नाही - मंग वर हात का करावं? तर मानसाच्या अंगात अभिमान आहे. जो तो मानूस कुठीही जाईल, तो आपल्या दिमाखातच. त्याले वाटते का मले मरनही येणार नाही, रोगही होणार नाही.

ज्याचा अभिमान – गे ऽ ला!

तुकोबा म्हनतत -

*ज्याचा अभिमान — गे ऽ ला ॥*
*अन् तुका म्हणे देव — झाला ॥*

गरीब माणूस मोठ्या मानसाले प्रनाम करते-

भाऊसाहेब! कसा करते? वाकून - भाऊसाहेब! पण भाऊसाहेबाले नाही वाकता येत. ते भाऊसाहेब म्हनतत् की, ए आज गडबड आहे, कल देखेंगे।

*ज्याचा अभिमान गेला ।*
*अन् तुका म्हणे देव झाला ॥*

हो ऽऽऽ!

*बंदे मत करना अभिमान -*
*कोई दिन उखड जायेगा प्रा ऽ न ।*

पहिलवानीत अभिमान असते - मैं पहेलवान हूं। पैशाचा अभिमान असते. अंबलदारीचा अभिमान असते. हे तरतऱ्हेचे अभिमान असते. ज्याच्या अंगात अभिमान नसील, तर तो मनुष्य देव होते पुढे.

*ज्याचा अभिमान गे ऽ ला ।*
*अन् तुका म्हणे देव झाला ॥*

देव पाहिला नाही. देव दिसला नाही अन् देव कोनाले दिसनार नाही. कोनी म्हने, राती स्वप्नात परमात्मा दिसले - शंख, चक्र, गदा सर्व साहित्य सामाईन घेऊन! परमात्मा नाही दिसला.

*जे जे मनी वसे ते ते स्वप्नी दिसे ॥*

माहा बाप स्वप्नात तुम्ही पाहिला होता का कधी?

— ना ऽ ही.

मग जे पाहिलं नाही ते दिसतच नाही. मंग जो फोटो पाहातो, तो फोटोतलाच देव दिसतो. देव नाही दिसत. देव दिसायची वस्तूच नाही, मंग तीर्थात देव नाही. आता आपण गनपती मांडता की नाही?

— हो ऽ य.

हे गनपतीची — गनपती बसोनं देवाची भक्ती नाही.

हे एक रूढी पडली. काय पडली?

— रू ऽ ढी.

हां! गनपती बसोनं देवाची भक्ती नाही. ज्या वक्ती गनपतीले आनता बॅन्ड लावता, भजन लावता, अन् वाजवत आनता.

*मोरया — मोरया — मो ऽ रया ।*

आनून शिंहासनावर बसवता. अन् त्याची पूजा करता - निवद, मोदक, आरत्या—शेवटच्या रोजी उठवता का नाही?

— हो ऽ!

मंग त्याले कुठी घेता?

— डोक्याव ऽ र!

बोला?

— डोक्याव ऽ र!

अन् मंग कुकडे लांबोता?

मोरया — मोरया — मो ऽरया ।

(गळ्याला हात लावून) एवढ्या पान्यांत - मोरया! चले जाव्! हे देवाची भक्ती नाही. ज्याची एवढी शोभा केली, ज्याच्या आरत्या केल्या, अन् त्याले पान्यांत बुडवून मारता? तुमच्यावर कधी खटला भरला तर फौजदारी होते. देवाची भक्ती नाही, देवाची भक्ती भजन!

*गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला ॥*

आज काय आहे इथं? पोलीस लाइनीत?

— पू ऽ जा.

सत्यनारायन आहे. काय?

— सत्यनारायन.

सत्यनारायन देवाची भक्ती नाही. सत्यनारायन कोन करते? लोभी लोक. मुलगा

नाही - सत्यनारायना पाव, गाडी नाही - सत्यनारायन करू.

पैसा हातात मिलत नाही, सत्यनारायन करू. ते जागा मले कधी मिळेल, सत्यनारायण करेल.

लोभी लोक! सत्यनारायन देवाची भक्ती नाही. सत्यनारायनाच्या पोथीमध्ये असं आहे की, साधूवान्यानं परसाद नाही घेतला, अन् सत्यनारायन नाही केला, त्याची करोडो रुपयांची नौका पान्यात -

— बुडा ऽ ली!

अडीच रुपयांचा सत्यनारायन केला अन् परसाद वाटला, परसाद घेतला अन् करोडो रुपयांची नौका वर आली, ते वर —

— आ ऽ ली!

आँ! वर?

— आ ऽ ली!

नाही नाही. हे खरं नाही. ज्या साली लढाई झाली, त्या साली, लढाईच्या साली, समुद्रात एकेक आगबोट, पन्नास पन्नास कोट रुपयांची पार तळाला गेली. पत्ता नाही. अशा किती आगबोटी बुडाल्या. सत्यनारायन करनाऱ्या महाराजाले म्हनावं, अडीच रुपये घेऊन कशाला एवढी बडबड करता - अडीच लाख रुपये घ्या - अडीच कोट रुपये घ्या - समुद्राच्या किनाऱ्यावर एक सत्यनारायन करा अन् एक आगबोट आना वर. जमेल का?

— ना ऽ ही!

*गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला ॥*

देवळात देव नाही.

नही महजिद में नही देवल में ।

हजरतच्या मजिदीत नही, हिंदूच्या देवळांत देव नाही.

*नही मेहजिद में नही देवल में ।*
*हिरा खोया कचरे में ॥*

देऊळ तयार झालं. मूर्ती आनाव् लागतत् की नाही?

— हो ऽ य!

बोला?

— हो ऽ य!

मग मूर्ती इकत की फुकट?

— इकत.

देव इकत भेटत असते? सांगा! मंग देव इकत न घेता सूर्यनारायन घ्याव्!

जेवढे पैसे पडतील तेवढे पडू द्या, अन् आपल्या घरात आनून बसवून टाका! देव इकत भेटते का? मेथीची भाजी होय, का कांदे-बटाटे होयेत? देव इकत भेटते, ही समजच नाही ज्या मानसाले, तो मानूसच कसा? बरं, आनले देव. बसोले देवळात. तुमच्या देवाले आंग धुता येते का?

— ना ऽ ही!

ज्याले आंग धुवायची अक्कल नाही, त्याला देव म्हनता? तुमच्या देवाले धोतर नेसता येते का?

— ना ऽ ही!

ज्याले धोतरही नेसता येत नाही, त्याला देव म्हनता? तुमच्या देवापुढे निवद ठेवला—कुत्रं भिडलं, तर कुत्रं हानता येते का?

— ना ऽ ही?

कुत्रंही हानायची ज्याच्या अंगात ताकद नाही त्याले देव म्हनता? बरं, तुमच्या देवाचा देवळापुरता तरी, आत उजेड पडते का?

— ना ऽ ही!

इझला दिवा, मंडळी आली, बापूराव, दिवा लावा. मंडळी दर्शनाला आली आना दिवा. देव कोनी दाखोला?

— दिव्या ऽ नं!

दिवा मोठा की देव मोठा?

— दि ऽ वा

देवळात देव नाही. देव कुठ आहे? या जगात देव आहे. जगाची सेवा करा! हात वर करून भजन करू —

*गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला ।।*

बिर्टिश सरकारनं मोठं एक आपल्यावर आरिष्ट आनलं होतं. मग सत्याग्रह केला की नाही लोकइनं?

— हो ऽ य!

कोनी देवलातले देव आले होते का मदत कराले? वान्द्र्याचे राम आले, दादरचे इठोबा, पाह्यले होते का?

— ना ऽ ही.

वाळकेश्वरचे महादेव पाह्यले होते का?

— ना ऽ ही.

मंग कोनं सत्याग्रह केला? मानसानं! कोनं केला? कोनं केला?

— मानसानं ऽ!

अन् मंग कोनं् चले जाव् म्हनलं? गांधीजीनं ऽ!

गांधीजीनं! कोन चले जाव म्हनलं?

— गांधीजी ऽ!

मग गांधीजीले देव म्हना. की शेकडो वर्षं राज्य केलं, अन् एका शब्दानं ज्यानं म्हटलं, की तुम चले जाव! गेले का राहिले?

— गे ऽ ले!

गांधीजीले देव म्हना.

*गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला ।।*

बडे जोरसे, बडे प्रेमसे, महात्माजीकी जय बोलो!

महात्मा गांधी की —

— ज ऽ य!

दो दो रोटी खाये, लोटा लोटा पानी पिये अन् आवाज अंदर चला, उसकू बाहेर निकालो —

जिन्होने लोकों के वास्ते तुरुंग भोगा, पोलिस के धक्के खाये, अंधारी रात कोठडी में वास किया, बिर्टिश के घोडेका दाना भरडा, लोकों के वास्ते - उसके नामसे ऐसी जय बोलो, की जैसी तोफ छूटती है. महात्मा गांधी की —

— ज ऽ य!

शाबास! अपने अपने बाप की जय बोलो! हमारे बाप बडे अंबलदार थे. हमारे बाप बडे शेट थे, - बोलो - हमारे बाप की! हमारे आजेपंजे का नाम कोई गूखाडी में भी नही लेगा. गांधीजी के नाम ने पुर्थईपर बरसात किया बरसात!

*गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला ।।*

दस मिनिट, दस मिनिट में सब पुर्थईभर पसारा—गांधीजी का खून हो गया! महात्माजी गये ऽ ऽ ऽ! महात्माजी गये ऽऽऽ! महात्माजी गये! दस मिनिट में. हम ऐसे है, इस घरमें हम मर गये, तो पीछेकी घरवालेकू छे महिने नही मालूम होता. उसके घरकू सगेवाले आते, रोते, क्या हुवा हो? वो गनपतसिंग कल रातकू मर गया. अरे, हमकू मालूमही नही, जो कुत्ता मर गया साला! मानसाचं धन तिजोरी नाही, सोनं नाही, हिरे नाही, मोटार नाही! मानसाचं धन कीर्ती! कबीर पुरावा देत,

*सुरत से कीरत बडी बिनपंख उड जा ऽ य ।*
*सुरती तो जाती रही कीरती कबू ना जा ऽ य ।।*

जबलग सूरज चांद है पुर्थईपर, तबलग गांधी मरते नाही. गांधीजी जिंदे है. मरनेवाले, आनेवाले, जानेवाले हम है, गांधीजीकू मरनच नही.

*तुका म्हने एक मरनचि खरे ।*

*उत्तमचि उरे कीर्ती मा ऽ ऽ गे ॥*

मरन पर्तेकाल लांबोनार! मरन काही या जगात कोनाला ठेवत नाही. ठेवनार नाही, कचेरीतले शिपाई मरतील की राहतील?

— मरती ऽ ल!

अन् कोन्या रोंजी त्याचे अंबलदार अधिकारी त्याच रस्त्यानं जातील की नाही?

— हो ऽ य!

मग मरन सगळ्यांचा काटा काहाडनार. पन कीर्ती मरत नाही. वर हात करून भजन करू —

*गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला ॥*

देव कुठं आहे? जगात आहे. देव जगात.

जगाची सेवा करा. गरिबावर दया करा.

*धरम करो गरिबीसे मग्रोरी में धोका है ।*
*तुम बोलो मैं दाता हूँ तो माल कहाँसे आता है ॥*

चार महिने बरसात कोन देते? परमात्मा. मंग पिकते जमीन. चार महिने बरसात नाही पडली, तर जमीन पिकेल का?

— ना ऽ ही!

हजारो, करोडो लोक मरतील. देवाचं भजन करा. देवाला काही तुमचं आवडीचं नाही. फुलं वाहता की नाही?

— हो ऽ य!

फूल कोनं पैदा केले?

— देवा ऽ नं!

का आजानं का पंजानं? मग त्याचेच फुलं, त्याचीच बरसात, त्याचंच त्यालेच देतो! मंग आपन् काय देवाव्? सुंदर वर हात करून सुंदर टाळी वाजवाव्—

*जनी जनार्दन — जनी जनार्दन ।*
*संत बोलती — वच ऽन!*

— हो ऽ! संत पुरावा देतात की जगात जनार्दन आहे. गरिबासाठी बायांचं इस्पिताल बांधा. गोरगरिबाले औषधी द्या. गोरगरिबाले वार-दोन वार कपडा द्या. अस्तेर-पावशेर चावल द्या. गोरगरिबाले दया करा.

जनी जनार्दन - संत बोलती ... वच ऽनी । या पुर्थईवर मोठे कोन आहेत? संत आहेत. संत त्याले पुरावा आहे. एक सभा भरली. त्या सभेत विषय उत्पन्न झाला- सबसे बडा को ऽ न! सबसे बडा को ऽ न! एक म्हने - धरतरी कायसे बडी! वो तो शेषके माथेपर खडी ऽ ॥ धरतरी को बडी कहते हो, तो शेषके माथेपर खडी

है। एक म्हने - शेष बडा! एक म्हने ... शेष कायसे बडा? वो तो शंकर के गले में लपट के ... प ऽ डा ॥

शेषको बडा कहते हो तो शेष शंकरजीके गलमें लपटके पडा. एक म्हने शंकर बडा। एक म्हने शंकर कायसे बडा? वो तो नंदीपर बैठके ... च ऽ ला । एक म्हने नंदी बडा। एक म्हने नंदी कायसे बडा? वो तो कैलास में ... खडा ऽ। नंदी को बडा कहते हो, तो कैलास में खडा है. एक म्हने - कैलास बडा। एक म्हने - कैलास कायसे बडा? वो तो रावनने तीन दफे ... उखा ऽ डा। कैलास को बडा कहते हो तो रावनजीने तीन दफे उखाडके फेक दिया था. एक म्हने - रावन बडा. एक म्हने रावन कायसे बडा? वो तो वालीके घरकू अंदरके झूलेपर लपटके पडा ऽ! रावनाले वालीच्या घरी अंगदाच्या पायन्यावर टांगलं होतं. एक म्हने वाली बडा। एक म्हने वाली कायसे बडा। वो तो रामजीने एकही बानसे पछा ऽ डा ॥ वालीको बडा कहते हो तो वालीको रामजीने एक बानसे मारा. मंग ... मंग ... एक म्हने राम बडा। एक म्हने राम कायसे बडा? वो तो संतजनके शरनमे ... पडा ऽ। कोन मोठं आहे? संऽत! ते संत पुरावा देतत् की या जगात जनार्दन आहे.

*जनी जनार्दन - जनी जनार्द ऽ न ।*

अन् तुकोबा म्हनत्त,

*संत बोलती वच ऽ न ॥*
*संत बोलती वचन ॥*

आमचे भोळवट लोक! अरे, नारायनानं घर बांधलं गावला. पाच हज्जार रुपयांचं. दोघं-तिघं म्हनतात - लेका त्याले देवानं दिलं.

कुनी दिलं!

— देवा ऽ नं!

मरा पावसा-उन्हाळ्यात. देव घर नाही देत. मरा खुशाल. घरं बांधील मानूस. घर अन् गमाइल!

माणू ऽ स!

हे भोळवट! देवानं दिलं! बंबईमध्ये जास्त लक्ष्मी कोनाजवळ आहे? मारवाडी, गुजराथी, भाटे आणि ब्राह्मन! खाना खराब कोणाचा झाला बंबईत? मराठे, माळी, तेली, न्हावी, धोबी, चांभार, कोळी, कुम्भार, लोहार, बेलदार, कैकाडी, गोंड, गवारी, मांग आणि महार. जनावरासारखे! तीनच माणसं मजेशीर आहेत. गुजराती, मारवाडी, ब्राह्मन. दररोज तुपातला शिरा खातात. आज कोनाही मराठ्याले पुसा - जेवला का? होय. कालवन? आमटी ऽ! आजापंजापासून आमटी याच्या घरात घुसली, बाहेर निघतच नाही!

*गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाल ।।*

— हो ऽ! काही मानसं टाळी वाजोतत् जसे लढाईतले वीर होयेत. अन् काही काही माणसावर कठीन वखत आहे. आपण एकदा बिनटाळाची बिन मृदुंगाची टाळी वाजवू. मात्र गडबड करू नका. आणि अशे अशे वाजवून नका. सर्वांच्या टाळीचा एकच आवाज आला पाहिजे. रप्-रप्! करा वर सरळ हात. सरळ हात वर! माझ्या हातावर ध्यान ठेवा बरोबर! हा!

*गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला ।।*

हे लोक का गरिबीत राहिले? एक तर याहीले नाही विद्या. काय नाही?

— वि ऽ द्या!

ज्याले विद्या नसेल त्याले खटाऱ्याचा बैल म्हटलं तरी—

— चाले ऽ ल!

आता तरी सुधरा. आता तरी मुलाले शिक्षण द्या. पैसे नाही म्हनाल तर जेवनाचं ताट मोडा. हातावर भाकरी खा. बायकोले लुगडं कमी भावाचं घ्या. इकायाला पाहुनचार करू नका, पन मुलाले शाळेत घातल्याविने सोडू — नका ऽ!

विद्या मोठं धन आहे. विद्या मोठं धन आहे. यातलेच मानसं दिल्लीच्या तक्तावर भाशेन करतात. आनि यातलेच बोरीबंदरच्या ठेसनावर पोते उचलतात. ते मानसं अन् हे कोन! हे काई बैल नाहीत ना? कोन आहेत?

— मानसं ऽ!

मोठी मोठी गोष्ट आहे विद्या, मोठी गोष्ट आहे. या टायमाले विद्या मुलाले न शिकवाल, तर तुम्हाले आम्हाले विद्या नाही, तर मजुरी तरी लागली! पन पुढं तुमच्या मुलाले मजुरी लागनार नाही, तर बुटपॉलिश करावं लागेल. 'इधर आ. देड आणा. चले जाव.' बुटपॉलिश करावं लागेल. महाराज विद्या केवढी मोठी आहे. डॉक्टर आंबेडकरसाहेब, यांच्या पिढ्यान्पिढीत झाडू मारायचं काम केलं. त्यांच्या वडिलाले सुबुद्धी सुचली आणि आंबेडकरसाहेबाले शाळेत घातलं. आंबेडकरसाहेबानं काही लहानसहान कमाई नाही केली. हिंदुस्थानची घटना केली घटना, अन् तेच शाळेत जाते ना, अन् शिकते न्रा, तर झाडू मारनंच त्यांच्या कर्मात होतं. विद्या मोठं धन आहे. जेवनाचं ताट मोडा, बायकोला लुगडं कमी भावाचं द्या. मोडक्या घरात रहा. पण मुलाले शिक्षण दिल्याविने सोडू —

— न ऽ का.

आणि दुसरं शिक्षण, परमात्माची भक्ती.

*गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला ।।*

संसाराची काटकसर—मारवाडी, गुजराथी, ब्राह्मण भाटे हे का रोज तुपातला शिरा

खातात? त्यांच्या घरी जमाखर्च आहे. काय?

— जमा ऽ खर्च

उत्पन्न किती अन् खर्च किती याची लैन मालूम आहे. अन् आमच्या मराठ्याले, तेल्या, माळ्या, न्हाव्या, धोब्याले —. याले जमा-खर्च समजतच नाही. याचं कसं आहे? पौनसे रुपये उत्पन्न. आणि ऐंशी रुपये नव्वद रुपये खर्च! जानेवारीत मजा करा आणि फेपरवारीत बोंबलतं बसा. काटकसर पाहिजे. घरी जमाखर्च पाहिजे. लइ जन म्हनतात पगार पुरत नाही. पगार पुरत —

— ना ऽ ही!

पगार सरतच नाही असं म्हटलं पाहिजे. ज्या घरात नवरा-बायको बुद्धिमान, अक्कलवान असतील, तिथं पगार सरत नाही. शिल्लक पेटीत टाकली पाहिजे. पगार कोनाले पुरत नाही?

ताकद थोडी घुसा घणा -

एकांद्या मानसाले जोर कमी. करायला पहिला नंबर. पुढं गेला अन् दोन तोंडात बसले की चालला बोंबलत घराकडे. पुंजी थोडी, खर्चा घणा सवाशे रुपये पगार अन् दीडशे रुपये खर्च. जानेवारीत मजा अन् फेपरवारीत गप बसा. संसारात स्वच्छता, काटकसर अन् मोठी गोष्ट दया. मोठी गोष्ट?

— द ऽ या!

*तीरथ जाव काशी जाव चाहे जाव गया ॥*
*कबीर कहे कमालकू सबसे बडी दया ॥*

ज्या धन्याच्या अंत:करनात दया असेल तो सत्पुरुष आहे, सत्पुरुष! मराठे मंडळी, जेजुरीला जाता का नाही?

— हो ऽ य!

बकरा नेता का नाही?

— हो ऽ य!

मानेचा तुकडा कापता की नाही?

— हो ऽ य!

मसाला लावून शिजवून खाता की नाही?

— हो ऽ य!

तुमच्या पिढ्याच्या पिढ्या मरतील - तुमच्या जेजुरीला जानाऱ्याच्या. तुमचं कधी बरं होनार —

— ना ऽ ही!

*गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला ॥*

तुम्ही मऱ्हाठे, तुकोबाराय मऱ्हाठे. तुम्हाले एक पुरावा सांगत्त -

*जन्मवरी पोसे-लेकुराच्या परी ऽ ।*

*जन्मवरी पोसे-लेकुराच्या परी ऽ ।*

बकऱ्याला चारा टाकता की नाही?

— हो ऽ य!

बकऱ्याला पानी पाजता की नाही?

— हो ऽ य!

हारपला बकरा, पाहून आनता की नाही?

— हो ऽ य!

पाऊस आला, बकऱ्याले घरात बांधता की नाही?

— हो ऽ य!

पोटच्या मुलासारखा वागवता बापा, अन् त्याले मसाला लावून कापून खाता कापून! मानसं नाहीत तुम्ही. यान्ले रानडुक्कर म्हनलं तरी चाले ऽ ल!

*गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला ।।*

लग्नात गोंधळ घालता की नाही?

— हो ऽ य!

बकरा आंगणात कापून रक्ताचा सडा पडते का नाही!

— हो ऽ य!

अरे एकाच्या डोळ्यातून पान्याचा थेंब नाही येत की हे पाप आहे! आपन वाईट करतो. सोडून देऊ! एकाच्या तरी तोंडून निघते का? मसाले लावून शिजवून खाता.

अन् एवढं एक पोरं मेलं घरात, तर सारं घर तोंड बडवते - अरे बापा! आता कसं करू? फार वाईट झालं! मोठ नुकसान झालं! म्हातारा म्हनते, हत्ती गेला बापा। मी वाचून काय करू बापा। मले विहीर दाखव बापा! काय म्हनते?

— विही ऽ र दाखवा!

आ?

— विही ऽ र दाखवा.

तो म्हातारा त्याच गावातला होय की नाही?

— हो ऽ य!

त्याला विहीर मालूम आहेत की नाही?

— हो ऽ य.

तो सोंग कशाल दाखवते? उठ अन् टाक उडी! रडत नाही, तो सोंग दाखोते. आपल्या वक्ती बोंबलता न् दुसऱ्याले शिजवून खाता शिजवून? हे काय मानसाचं

लक्षन आहे? हे आमचे नारळीपोर्णिमेच्या रोजी कोकनी मंडळी — गोइंदा! दोन दोनशे, पाच पाचशे - गोइंदा! गोइंदा! गोइंदा! गोइंदा! गोइंदा! अन् एकेक कोंबडं सगळं खलास करत्त्. हा काय गोइंदा? पाप आहे पाप! ज्याच्या हातानं दुसऱ्याच्या मानेवर सुरी जात असेल, त्याचा प्राण, कापून आपलं पोट भरत असेल, हा मानूस? मानसाचा त्याच्या अंगात काही अंश नाही.

*गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला ॥*

मारवाड्याच्या घरी कोंबड्या आहेत का?

— ना ऽ ही!

गुजराथ्याच्या घरी कोंबड्या आहेत का?

— ना ऽ ही!

भाट्याच्या घरी कोंबड्या आहेत काय?

— ना ऽ ही!

ब्राह्मनाच्या घरी कोंबड्या आहेत का?

— ना ऽ ही!

अरे, तुमच्या घरात कसे घुसले? साऱ्या घरांत कोंबड्यांचा सुलसुलाट.

को ऽ को! कु कू कू! पाप आहे तुमच्या पोटात. सकाळी ढोबरांत पानी ठूता, दाने टाकतां - संध्याकाळी कापून खाता - कापून? कोणतं शास्तर आहे दाखवा!

*गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला ॥*

विद्या शिका, अन् गरिबाले विद्यासाठी मदत करा. गरिबाच्या मुलाले चड्डी द्या. खादी टोपी द्या. शिस्पेन, पाटी द्या. कोरी वही द्या. आपला पोराले बिलायतला पाठवायची इच्छा करता, अन् एक-दोन आन्यांची वही देन्याची गरिबाचे मुलाले - आपल्या पोटात बुद्धी नाही? आपण मानसं नाही.

*थोडा तरी! तुका म्हने परुपकार करी ।*

विलायतला नका पाठवू त्याला. सादा जाडा वारभर कपडा द्याल? त्या पोराले चड्डी नाही. दिवाळीला टोपलंभर लाडू केले घरी. घरच्या पोराले खूप घाला, परसाकडला येईपर्यंत; पन दोन पोरं गरिबाचे येऊन उभे राहिले, त्याले दोन लहान- दोघाले दोन लाडू द्या. काहीतरी करा. बायकापोरं पोसून मराल, फुकट जलम आहे फुकट! कुत्री आपल्या पिलाला पाजते. चिमणी आपल्या पोराले चारा नेते, मुक्या जनावरानं केलं ना! मंग मानसानं मानसाच्या जल्मात येऊन काय करावं? परुपकार कराल, तर हा मानूस आहे. ज्याला आपली बायकापोरंच समजत असतील, तो मानूस नाही, बैल आहे. घर बांधलं ते घर बांधलं, मोटर घेतली, ते आनलं, हे केलं, लग्न केलं! मंग तुकोबानं दिला पुरावा, तो कसा?

*तुका म्हणे हेला - तुका म्हणे हे ऽ ला ।*
*पानी वाहता वाहता मे ऽ ला ।*

बायांनो हो, नवरा तीर्थाला जाईल, जाऊ द्या. नवऱ्याचा देव डोंगरात असील. पन तुमचा देव घरात आहे. आपापल्या नवऱ्याची सेवा करा. दररोज नवऱ्याच्या पाया पडा. नवऱ्याच्या गळ्यात फुलांचा हार घाला. नवऱ्याच्या पुढे उदबत्ती लावा.

*ऐसा पतिवरतेचा भा ऽ व ।*
*तिचा नवरा तिचा दे ऽ व ॥*

हे मराठे, न्हावी, धोबी, कोष्टी, कुंभार म्हणतील, लेका लई चांगलं झालं. बायको नवऱ्याच्या पाया पडेल, तर लई चांगलं झालं. कसं सांगितलं?

— लई ऽ चांगलं ।

हां! लई ऽ चांगलं! पण नवऱ्याच्या अंगात देवाचे गुन पाहिजेत की नाही?

— हो ऽ य!

नाही तर नवरा दारू पिऊन आला अन् घरात वोकला. मंग उदबत्त्या त्यांच्या ढुंगणाकडं लावाव का तोंडाकडं लावाव् बायकोनं? सांगा. असा नवरा असेल त्या बायकोनं नवऱ्याची महापूजा करावं! गरम चुलीतील राख टोपल्यांत भरा अन् त्याच्या तोंडात टाकून द्या. घे तुझी महापूजा!

*गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला ॥*

भांडे घासणाऱ्या बाया आहेत. मोठ्या मोठ्या घरी त्या घरच्या बाया शंभर शंभर रुपयांचं लुगडं नेसतंत्. भांडे उटणारी बाई आहे - चारी बाजूनं लुगडं फाटलं - दोन लेकरं जमिनीवर टाकते. अन् एवढा मोठा भांड्यांचा ढीग उचलते. तिची दया येऊ द्या. तिले दिवस असतील आणि दरिद्री अशील! बायंतपन कसं करील? आपन तिले मदत करा. गहू नका देऊ, जवारीचं पीठ द्या. तूप नका देऊ, तेल द्या. नवं लुगडं नका देऊ, जुनं लुगडं द्या. काही करून मरा. नेसून अन् खाऊन मराल, तर फुकट जलम आहे फुकट!

*गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला ॥*

आपल्या हिंदुस्थानाले मोठा एक डाग आहे डाग. तो डाग धुऊन काढायचा प्रयत्न करा. तो डाग कोणता? शिवशी ऽ ल!

काय करशील?

— शिवशी ऽ ल!

तू कोन? जात पुसनं - ज्याच्या अंगात अभिमान आहे, तो जात पुसते. तू कोन? जो जात पुसते त्याच्यासारखाच तो आहे की नाही?

— हो ऽ य!

याले चार हात अन् त्याले दीड हात आहे का? बोला.

— ना ऽ ही!

यानले चार पायं आहेत अन् त्याले एकच तंगडं आहे, असा आहे का?

— ना ऽ ही!

मंग तू कोन का पुसता? कोनी तुम्हाले जात विचारील तू कोन, तर म्हनावं मी मानूस, कोन आहात तुमी? मानू ऽ स! का म्हैस आहात?

— ना ऽ ही!

कोन आहा?

— मानू ऽ स!

मानूस! कोन तू - तर म्हनावं मानूस. कोन आहात?

— मानू ऽ स!

जात पुसनाऱ्याला काही शरम नाही वाटत. त्याच्यासारखाच तो आहे, अन् जात पुसते, तू कोन? आपल्यासारखाच आहे, का त्याला काही चूक आहे?

— ना ऽ ही!

तुमचं आमचं दोन काय आहे दाखवा.

तुमची आमची जमीन एक की दोन?

— ए ऽ क!

तुमचं आमचं आकाश एक की दोन?

— ए ऽ क!

सुरेनारायन एक की दोन?

— ए ऽ क!

आगगाडी एक की दोन?

— ए ऽ क!

टेक्शी मोटर एक की दोन?

— ए ऽ क!

काल्हेरा, पिलेग, एक की दोन?

— ए ऽ क!

जेवन एक की दोन?

— ए ऽ क!

दोन दाखवा. मंग म्हना शिवशील. काय दोन आहे सांगा, तुम्ही आम्ही एका रस्त्यातून जलमलो - का आम्ही आईच्या यवनीतून पडलो - अन् तुम्ही काय तोंडातून पडले, का बाहेर बगलीतून निघाले - सांगा! मानसाले जाती दोन आहेत दोन. किती?

— दो ऽ न!

बाई आणि पुरुस. या दोनच जाती आहेत.

तिसरी जातच नाही.

तुम्हाले दात किती आहे?

— बत्ती ऽ स!

बोला?

— बत्ती ऽ स!

हरिजनाले किती आहेत? बत्तीस. का तुम्हाले बत्तीस आहेत अन् त्याले दहाच आहेत?

— ना ऽ ही!

तुमच्याबरोबर आहेत का नाही?

— हो ऽ य!

तुम्ही आईच्या पोटात किती दिवस? नव महिने नव दिवस! हरिजन किती दिवस? चार महिने का सहा महिने?

— ना ऽ ही!

बोला?

— ना ऽ ही!

तुमचं आमचं दोन दाखवा. उगचं काहीतरी शिवशील? अरे अरे! हे असं नाही चालनार. दोन दाखवा. मंग सांगा. कोणी म्हनेल शास्तर. शास्तर कोनालाही करता येईल. कोन्याही जातीचे पन्नास पोरं जमवा, शिकवा त्याले. वेद बोलून घ्या. भागवत ऐकू द्या. जे सांगेल ते. पण मुळातून देवाच्या घरून काय दोन आहे ते दाखवा. तुमची आमची गंगा एक की दोन?

— ए ऽ क!

हे ऽ ऽ इकडून निघाली मराठ्याची नदी, ती मांगाची आली तिकडून. असं आहे का?

— ना ऽ ही!

हिंदुस्थानाले डाग आहे. शिवाशिवीचा डाग आहे,

विलायतमध्ये शिवशील म्हनतात का कोनी?

नाहीत. रशियाच्या राज्यांत? नाही –

जपानमध्ये? नाही. चीनमध्ये? नाही. लंडनमध्ये? नाही. अमेरिकेमध्ये? नाही.

फारशी लोकांत? नाही! क्रिश्शन लोकांत? नाही. मुसलमानांत? नाही. म्हटलं होतं हाजरतनं कधी? की बिटाल डाला सालेने, पानी बिटाल दिया, म्हटलं होतं?

— ना ऽ ही!

अरे लेका चांग्या पानी बाटलं - म्हनता की नाही साहेब?

— हो ऽ य!

मुसलमानाचं, क्रिश्शनचं बाटत नाही, अन् सालं तुमचं पानी कसं भिकार आहे? ते का बाटते? तांब्या बाटते की नाही?

—हो ऽ य!

त्याला सुधा करता का नाही?

— हो ऽ य!

कसा सुधा करता? सांगा! बोला - अहो, तांब्याला हात लागला, सुधा कसा करता? आ? भाजून. इस्त्यांन भाजून? होय! भाजून. अन् मानूस बाटते का नाही?

— हो ऽ य!

मंग त्याले साल्याच्या अंगावर गवत टाका अन् द्या आगपेटी लावून. पेटू द्या! हरिजनाले बैलगाडीत बसू देता का?

— ना ऽ ही!

काय होते? - अन् त्या मोटरच्या स्टँडवर तुमची अक्कल कुत्र्यानं खाल्ली का? नारायन पटेल - बैठो! गणाप्पा - बसा! केशवराव भटजी - बसा! शिवऱ्या मांग बसा ऽ! मग का नाही म्हणत, मोटर बाटली, मांग बसला, आम्ही नाही बसत! पोकळ! उंदीर कुठी उकरते! पोकळ जागा! पोकळ जागा - खडक लागला की, उंदीर पलटला.

मोटारीपाशी तुम्हाले कोन फुटाने देईल?

शिवाशिव काढा. शिवाशिवी काढा. सरळ शहाने व्हा. अन् मानूसपना पैदा करा. या शिवाशिवीनं लाखो लोक खिरीश्चन झाले, लाखो लोक हजरत झाले. या शिवाशिवीनं हिंदू धर्माला घात आनला. घात - वर हात करून भजन करू -

*गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला ।।*

तरुन मुलांनो हो, ज्याचा बाप दारू पीत असेल - कोन?

— बा ऽ प!

अन् तो बाप दारू पिऊन सापडला ... त्याचं बापाचं नातं तसंच ठेवून द्या. तो बाप नाही, वैरी आहे. अन् जा त्याच्या अंगावर, धरा त्याची शेंडी अन् काढा पायातला बुट. असा बडवा, की धोतर भरल्याशिवाय त्याला सोडूच नका! तर तुम्ही मुलं नाही तर तुम्हाले खालमाने मेंढरं म्हटलं तरी —

— चाले ऽ ल.

हे दारू पिणारे मुर्दाड पहिलवान, मराठे, माळी, तेली, न्हावी, धोबी, चांभार,

कोष्टी, कुंभार, लोहार, बेलदार, कैकाडी, गोंड, गवारी, इनकर, धनगर, मांग, आणि महार!

मारवाडी दारू पिऊन बंबईत पडता पाहिला का?

— ना ऽ ही!

गुजराथी दारू पिऊन बंबईत पडता पाहिला का?

— ना ऽ ही!

ब्राह्मण दारू पिऊन कचेरीत पडता पाहिला का?

— ना ऽ ही!

जे जे दारू पितील त्यांचा खाना खराब झाल्याविने कधी राहनार –

— ना ऽ ही!

*गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला ।।*

आज बांद्र्याच्या मंडळीचं मले दर्शन झालं. मी तुमच्यापुढं भजन केलं अशील. आपन मले डोळ्यानं पाहिलं अशील - कल्पना असते, गाडगेबुवा गोधडेबुवा पाहिले नाही, आज भेट झाली, आता हे माझी शेवटची भेट आहे. माझं मरन माझ्यापुढं उभं आहे. आता एथून जावं लागील. तुमचे पाय दिसले, माझ्यावर उपकार आहेत - रेल्वे पोलीस बांद्रा ठेशन. या मंडळीनं मला तुमचे चरण दाखविले. तुम्ही गाडगेबाबा गोधडेबुवा पाहिले नसतील, तर भेट झाली. कीर्तन आटोपलं. मी बोलता बोलता चुकलो आशीन तर माझ्या चुकीची क्षमा करून जा.

दुर्दैवाने बाबांचे हे शेवटचे कीर्तन ठरले. बाबांना आपला मृत्यू स्पष्टपणे समोर दिसत होता तरीही जनसेवा करण्याची ओढ कायम होती. मुंबईत आठ-दहा दिवस बाबा राहिले. मग 'वऱ्हाडात चला' असे म्हणाले. बाबांनी जन्महीं वऱ्हाडातच घेतला होता. आणि अखेरचा विसावाही त्यांना वऱ्हाडातच घ्यायचा होता. बाबा मुंबईवरून नाशिक, मनमाड, भुसावळ, मूर्तिजापूर घेत घेत अमरावतीला आले. येथे आल्यावर त्यांची प्रकृती अधिकच बिघडली. म्हणून त्यांना अमरावतीच्या इर्विन हास्पिटलमध्ये ठेवले. ती तारीख होती १३ डिसेंबर १९५६. बाबांना न्युमोनिया झाला होता. सोबतीला मधुमेह होताच. १७ तारखेपर्यंत बाबा दवाखान्यात राहिले आणि १८ तारखेला राठोडच्या बगिच्यात घेऊन चलण्याचा आग्रह करू लागले. त्यांच्या इच्छेप्रमाणे पहिले राठोडच्या बगिच्यात नेले व तेथून ते नवाथ्याच्या बगिच्यात गेले. १९ तारखेला बाबांच्या आग्रहावरूनच नगरवाडीला घेऊन जाण्यासाठी गाडी निघाली. चांदूर बाजारला जाईपर्यंत बाबांची प्रकृती आणखीनच बिघडली. म्हणून गाडीने पुन्हा अमरावतीची वाट धरली. गाडी वेगाने अमरावतीकडे येत होती. बाबा दारूबंदीचे कार्य करतात म्हणून ही गाडी त्यांना सरकारने दिली होती. बाबांचे आवडते 'गोपाला

गोपाला । देवकीनंदन गोपाला ॥' हे भजन सोबतची मंडळी म्हणत होती. गाडी वलगावच्या पेढी नदीच्या पुलावर आली. बाबांनी एकवार डोळे उघडून सर्वांवर नजर टाकली आणि डोळे मिटले. ज्योत विझली. ज्ञानाचा हा अखंड धगधगता यज्ञकुंड थंडावला त्या वेळी रात्रीचे बारा वाजून वीस मिनिटे झाली होती. म्हणजेच बाबांनी २० डिसेंबर १९५६ या दिवशी देह ठेवला.

या महापुरुषाने जन्मभर स्वत:साठी कुणाकडे पैसा मागितला नाही, फक्त मृत्यूपूर्वी दोन दिवस आधी डॉक्टरांचे बिल देण्यासाठी मंडळींना वर्गणी करायला लावली. आणि बिल दिले. स्वत:साठी लोकांकडून पैसे मागण्याचा त्यांच्या जीवनातील हा पहिला आणि शेवटचा प्रसंग.

बाबांचे निधन झाले त्या वेळी तुकडोजी महाराज मुंबईला होते. त्यांना ही वार्ता कळवण्यात आली. 'मी येत आहे' अशी त्यांची तार आली. बाबांच्या निधनाची बातमी वाऱ्यासारखी महाराष्ट्रभर पसरली. लाखो लोक अमरावतीच्या दिशेने धावले.

अमरावतीच्या इतिहासात झाली नसेल एवढी प्रचंड अंत्ययात्रा निघाली. लाखो लोक 'गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला ॥' असा घोष करीत अश्रू ढाळीत चालले होते. राठोड बगिच्यातून निघून परत यायला त्या महायात्रेला तब्बल नऊ तास लागले. शवयात्रा रात्री दहा वाजता राठोड बगिच्यात आली. तिथे चंदनाची चिता रचण्यात आली होती. रात्री साडेबारा वाजता तुकडोजी महाराज आले, त्यांनी बाबांच्या कलेवराचे दर्शन घेऊन श्रद्धांजलीपर भजन म्हटले.

रात्री दोन वाजून दहा मिनिटांनी बाबांचे नातू वासुदेव सोनवणे यांनी चितेस अग्निस्पर्श घडवला. चिता धडधडून पेटली. या कर्मयोग्याचा देह अनंतात विलीन झाला. त्या ठिकाणी आता बाबांचे भव्य समाधी मंदिर बांधण्यात आले असून तो चौक 'गाडगे नगर चौक' याच नावाने ओळखला जातो. तिथे रेंगाळत असलेल्या बाबांच्या स्मृती आजही आमच्या मनाला प्रेरणा देतात.

**भुकेल्यांना - अन्न, तहानलेल्यांना - पाणी, उघड्यानागड्यांना - वस्त्र, बेघरांना - आसरा, मुलामुलांना - शिक्षण, अंध-पंगू-रोग्यांना - औषध, बेकारांना - रोजगार, पशुपक्ष्यांना - अभय, दुःखी व निराशांना - हिंमत** हीच गाडगेबाबांची शिकवण आहे.

❑

# संदर्भ


१. श्री गाडगेमहाराज, गो. नी. दांडेकर

२. वैराग्यमूर्ती गाडगेबाबा, प्रा. रघुनाथ कडवे

३. श्री. गाडगे महाराज गौरव ग्रंथ, संपा. प्राचार्य रा. तु. भागवत



124330

31-3-08

I. I. A. S. LIBRARY

Acc. No.

This book was issued from the library on the date last stamped. It is due back within one month of its date of issue, if not recalled earlier.

CP&SHPS—519-I.I.A.S./2004-25-6-2004-20000.

# आमची इतर प्रकाशने

**युगपुरुष तुकाराम**
किशोर सानप — ३० रु.

**कर्मयोगी गाडगेबाबा**
मनोज तायडे — २० रु.

**क्रांतिसिंह नाना पाटील**
विलासराव पाटील — २५ रु.

**महापंडित राहुल सांकृत्यायन**
सरला कारखानीस — २० रु.

**फिडेल कॅस्ट्रो**
सरला कारखानीस — २० रु.

**अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल**
चित्रा बेडेकर — २० रु.

**डॉ. अलेक्झांडर फ्लेमिंग**
चित्रा बेडेकर — २० रु.

**कार्ल मार्क्स**
सरला कारखानीस — २० रु.

**ईश्वरचंद्र विद्यासागर**
दिवाकर बापट

Library IIAS, Shimla
MR 891.46 T 21 K
00124330

**महर्षी अण्णासाहेब कर्वे**
दिवाकर बापट

**महात्मा जोतीबा फुले**
वीणा कऱ्हाडे — २० रु.

मूल्य : २० रुपये

ISBN 81-86995-27-7